इतिहासायुर्वेद योगस्य

₹. २५

॥ शिवमुद्राकन ॥

पत्रिका

राष्ट्रीय सौर शकसंवत - श्रावण १९३९, युगाब्द ५११९

वर्ष २० वे | ऑगस्ट २०१७ | अंक तिसरा

॥ श्रीसद्गुरु उवाच ॥

संकटं टाळणं माणसाच्या हाती नसतं; पण संकटाचा सामना करणं त्याच्या हातात असतं.

BKL Walawalkar Rural Medical College

SVJCT's Walawalkar Hospital

Transforming lives... One at a time!

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट

प्रवेश सुरू

कॉलेज ऑफ ॲडव्हान्स स्टडिज

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई संलग्न

- डिप्लोमा इन हिमोडायलिसिस टेक्निशियन (२ वर्ष)
- डिप्लोमा इन ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (२ वर्ष)

शैक्षणिक पात्रता
१२ वी सायन्स किंवा
एम.सी.वी.सी. - एम.एल.टी.

- ॲडव्हान्स डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरटरी टेक्नॉलॉजी (१ १/२ वर्ष)
- ॲडव्हान्स डिप्लोमा इन डायटीक्स (१ वर्ष)
- ॲडव्हान्स डिप्लोमा इन एक्स-रे, रेडिओग्राफी ॲन्ड अल्ट्रासोनोग्राफी (१ १/२ वर्ष)

शैक्षणिक पात्रता
बी.एस.सी, बी.ए.एम.एस,
बी.एच.एम.एस, बी.व्ही.एस.सी.,
बी.पि.टी.एच, एल.सि.इ.एच,
डि.एच.एम.एस, बी.फार्मसी व तत्सम

समर्थ नर्सिंग कॉलेज

इंडियन नर्सिंग कौन्सिल,
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्न

- रिव्हाइज्ड जनरल नर्सिंग मिडवायफरी आर.जि.एन.एम. (३ वर्ष)

शैक्षणिक पात्रता
१२ वी सायन्स

- ऑक्सिलरी नर्सिंग मिडवायफरी ए.एन.एम. (२ वर्ष)

शैक्षणिक पात्रता
१२ वी कोणतीही शाखा

- पोस्ट बेसिक बी.एस.सी नर्सिंग पी.बी.बी.एस.सी.नर्सिंग (२ वर्ष)

शैक्षणिक पात्रता
आर.जि.एन.एम.पास

- एम.एस.सी.नर्सिंग(२ वर्ष)

शैक्षणिक पात्रता
पी.बी.बी.एस.सी.नर्सिंग किंवा
बी.एस.सी.नर्सिंग पास

भ.क.ल.वालावलकर ग्रामिण वैद्यकिय महाविद्यालय

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्न

बॅचलर ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी
(बी.पी.एम.टी.)
कालावधी ३ वर्ष

- फॉरेन्सिक मेडिकल सायन्स टेक्निशियन
- एन्डोस्कोपी टेक्निशियन
- कम्यूनिटी मेडिसीन टेक्निशियन
- इमर्जन्सि मेडिकल सर्व्हिस टेक्निशियन

शैक्षणिक पात्रता
१२ वी सायन्स

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचलित

भ.क.ल.वालावलकर रूग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र

मु.पो.सावर्डे - कासारवाडी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी - ४१५ ६०६. (महाराष्ट्र)
फोन नं. ०२३५५-२६४१३७/ २६४१४९ फॅक्स नं. ०२३५५-२६४१८१
वेबसाईट : www.walawalkarhospital.com ई-मेल : info@walawalkarhospital.com

।। दास-वाणी ।।

तुंड हेकांड कठोरवचनी । अखंड तोले साभिमानी ।
न्याय नीति अंतःकरणीं । येणार नाही ।।
तऱ्हे सीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा ।
राजकारण संवादा । मिळोंचि नेणे ।।
जय जय रघुवीर समर्थ,



दासबोध : १८/०६/०३-०४

अर्थ : तोंडाळ भांडकुदळ, आपला हेका न सोडणारा, बोलण्यामध्ये उद्धट, अहंकाराच्या तोऱ्यामधेच सतत वावरणारा. न्याय आणि नीतीचा मनात विचार सुद्धा आणत नाही. चमत्कारिक वर्तणूक, सदा भडकलेलाच, कोणत्याही मर्यादा झुगारून देतो. राजकारणी जनतेशी मिळून मिसळून सुसंवाद राखण्याची शक्यता नाहीच. समर्थकालीन आदिलशाही जुलमी सरदाराचे वर्णन उत्तम पुरुष समासात समर्थ राजकारणी कसा नसावा हे सांगताहेत. उत्तमपुरुषनिरुपण समास.

संकलक - डॉ. राम साठ्ये, पुणे

।। जय भवानी ।। ।।जय श्रीराम ।। ।।जय शिवराय ।।

साधारण औषधांच्या दुकानापेक्षा ३०% ते ७०% स्वस्त औषधे
पुणे जिल्हा ग्रामीण मधील पहिले पूर्णपणे जेनेरिक औषधांचे दुकान
तळेगाव - दाभाडे येथे
स्वातंत्र्यसैनिक स्व. नथुभाऊ भेगडे पाटील सेवा न्यास प्रेरित

श्री द्रोणागिरी औषधालय

स्वस्त औषधी सेवा, जेनेरिक मेडिसीन स्टोअर

शॉप क्र. ३, जय चेंबर्स, भंडारी हॉस्पिटल समोर, पंचवटी वसाहत, तळेगाव दाभाडे, पुणे - ४१०५०६

संचालक : संतोष वसंतराव भेगडे पाटील,

मो. ७३७८४६६०६७ , फोन नं. : ०२११४ - ३१०९६६

आपणास नेहमी लागणारी औषधे त्याची आपण आमच्याकडे नोंद केल्यास आम्ही आपणांस त्या औषधांची जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करु. आपल्या औषधांची नोंद करावी म्हणजे आपणास सेवा देणे सोपे होईल.

आमच्या Whatsapp - 7378466067 नंबरवर आपली आवश्यकता व प्रतिक्रिया नोंदवा.

रुग्णसेवा - ईश्वरसेवा


शुद्ध व नैसर्गिक
फोंडाघाट मध
आमची इतर उत्पादने :
गुलकंद, गुलाबपाणी, बेल,
आवळा मुरब्बा, औदुंबर जल
फोंडाघाट फार्मसी, शांती बिल्डिंग, मोगल लेन, माहिम,
मुंबई - १६. दूरध्वनी : २४३०८५४२
ई-मेल : phondaghat_pharmacy@hotmail.com

सर्वांग सुंदर आरोग्यासाठी
आयुर्वेद रसशाळेची दर्जेदार उत्पादने
BRAHMIPRASH
ब्राह्मीप्राश
विद्यार्थ्यांचा मित्र
SHATAVARI KALPA
शतावरी कल्प
शक्तिवर्धक
A.L.Tablet
ए.एल.टॅब्लेट
स्त्रीयांच्या आरोग्यासाठी उत्कृष्ट
माधवी तेल
केसांच्या आरोग्यासाठी
आयुर्वेद रसशाळा
२५, कर्वेरोड, रसशाळा चौक, पुणे - ४. फोन :०२०-२५४४०८९३/२५४४०७९६,
फॅक्स :०२०-२५४३५७११. e-mail : ayurrasa@vsnl.net

|| श्रीगुरूदेव दत्त ||
कॅन्सर, किडनी फेल्युअर, किडनी स्टोन, लिव्हर फेल्युअर,
हृदय रोग, स्पाँडीलिसीस, सोरायसीस, त्वचा विकार,
वंध्यत्व, मानसिक आजार, नैराश्य, मतिमंद मुले
या विकारांवर विशेष उपचारांसाठी
डॉ. संतोष भन्साळी D.H.M.S.(C.C.H)
व डॉ. वैशाली भन्साळी D.H.M.S.(C.C.H)
यांचे
गुरुकृपा होमिओ क्लिनिक
७१९/२०, मोतीवाले अपार्टमेंट, १ला मजला, उंबऱ्या गणपती चौक,
शगुन साडी सेंटरसमोर, लक्ष्मी रोड, पुणे - ४११ ०३०.
फोन : ०२०-२४४८३०३७, ६६०२५७७७८
कॅन्सर पेशंटनी वेळ ठरवून भेट घ्यावी.

।। श्री स्वामी समर्थ ।।
दिवस + रात्र
हेल्थ केअर
मेडीकल, सर्जिकल
आणि जनरल स्टोअर्स
१४, रावजी सोजपाल बिल्डींग,
गोखले रोड (उ), दादर (प) मुंबई २८.
© २४२१ ४१४१ / २४३८ ११११
मोफत घरपोच सेवा

इतिहासायुर्वेद योगस्य

।। शिवमुद्रांकन ।।

पत्रिका

। कार्यकारी संपादक ।

परशुराम चव्हाण - ८६ ००९१ ००९१

महाराष्ट्र राज्य शासनमान्य वाचनालयासाठी २००८ पासून शिफारसउल्लेख झालेले मासिक !

अनुक्रमणिका

संपादकीय - ६

दिनविशेष ७

राष्ट्राने गौरविलेले शौर्याचे मानकरी- हवालदार मेजर पिरू सिंग ८

सद्‌गुरु ९

शिस्तबद्ध क्रांतीच्या दिशेने मराठा तरुणाई .... चिंतामण पाटील १४

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे .... श्री. ना. भ. आदमणे १७

तणावमुक्त दिनचर्या .... वैद्य प्रिया नाईक २०

योगायोगाच्या निमित्ताने .... प्रा. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी २३

भारत - एक विश्वशक्ती .... के.जनरल(डॉ.) दत्तात्रय शेकटकर २४

जीवेत शरदः शत्मः (वाढदिवस) २८

• मुखपृष्ठ •

श्रृंगेरी मठ, कर्नाटक

८व्या शतकात आदी गुरू शंकराचार्यांनी भारतातील ४ पीठांपैकी स्थापन केलेले महत्वाचे पीठ

छायाचित्र- ज्ञानेश्वर वैद्य, नरसोबावाडी - ७३५०६ ९९२६७

|| श्री दिगंबरदासाय नमः || || श्री गणेशाय नमः || || श्री स्वामी समर्थाय नमः ||

श्री स्वामी समर्थ

मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स

• प्रामाणिक आणि विश्वसनीय सेवा • दिवस व रात्र सेवा • विनामूल्य घरपोच सेवा

आमच्या येथे सर्व प्रकारची देशी विदेशी औषधे मिळतील.

सरस्वती महाल नं.१, रानडे-गोखले रोड जंक्शन, दादर, मुंबई - ४०० ०२८. दूरध्वनीः २४३१३२८९/३२४२ मोबा. ९९६७५२९१०१

इनिमस्नापुर्वेद योगस

।। शिवमुद्रांकन ।।

पत्रिका

Email: shivmudrankan.p@gmail.com

। आशीर्वाद ।
श्रीसद्गुरु प.पू. काकामहाराज, पुणे-मुंबई-श्रीक्षेत्र डेरवण

। प्रेरक ।
वैद्यराज रमेश मधुसूदन नानल
श्रीमंत अरविंदराव सिद्धेश्वर इनामदार
श्री.विलासराव हरिकृष्ण तथा दादासाहेब पाटील
श्री.मल्हार कृष्ण गोखले

। संपादक ।
परशुराम चव्हाण - ८६ ००९१ ००९१

। वितरण प्रमुख ।
सौ. ज्योती चव्हाण

। अक्षर जुळवणी ।
श्री.विवस्वान सदानंद गोरे - ९४ २२३१ ७११०

। स्वामी, मुद्रक, प्रकाशक व संपादक ।
श्री.जगन्नाथ मनोहर तथा तात्या चव्हाण - ९८ ५०५४ ९१४६
यांनी सुबक मुद्रणालय, तळेगांव येथे छापून
शिवमुद्रांकन पत्रिका
अ/२ मानसनगरी, छत्रपती शिवाजी चौक,
तळेगांव जी.एच. ४१० ५०७ जि.पुणे (महाराष्ट्र प्रांत)
येथून प्रकाशित केले.

● या अंकात प्रकाशित झालेली मते ही त्या अभ्यासक, वक्ते व लेखकाची वैयक्तिक मते आहेत, त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

आधार
विमर्श त्रैमासिक संपादक
दैनिक, मुंबई तरुण भारत संपादक
श्री. रविंद्र गोळे

इतर सेवा शुल्कासह डाकेने घरपोच

• वार्षिक शुल्क - ३००₹ • पंचवार्षिक शुल्क - १२००₹
• आजीव सभासद -३०००₹ • निरंतर सभासद - ५०००₹

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

संपादकीय

भारतातील जातिव्यवस्था या विषयाचा सर्वांगीण वेध घेण्याचा प्रयत्न करणारा हा दुसरा अंक प्रसिद्ध होत आहे. पहिल्या अंकात या व्यवस्थेचा उगम आणि प्रवास तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर या महापुरुषांचे जातीविषयक विचार या विषयांवरील अभ्यासकांचे लेख समाविष्ट करण्यात आले होते. जिज्ञासू आणि विचारी वाचकांनी या अंकाचे स्वागत केले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी आवर्जून दूरध्वनी करून अंकाचे, कौतुक केले ही आम्हासाठी अतिशय आनंदाची बाब आहे. समाजजीवनाच्या विविध अंगांचे, सुमारे पाऊण शतक इतका प्रदीर्घ काळ साक्षीभावाने निरीक्षण करणाऱ्या बाबासाहेबांसारख्या महनीय व्यक्तीची प्रतिक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच ती, त्यांच्या एका छोटेखानी निवेदनाच्या रूपात शब्दांकित करून या अंकात समाविष्ट केली आहे. त्यांच्या प्रतिक्रियेच्या आशयाशी जवळून संबंध असलेल्या, 'जातीअंत शक्य आहे का?' या विषयावरील काही जाणकारांचे लेखही या अंकात प्रसिद्ध होत आहेत. त्याबरोबरच जातिभावनांची धार बोथट करण्याच्या कामी यशस्वीरीत्या राबविल्या गेलेल्या काही प्रयोगांची माहिती एका लेखातून वाचकांसमोर आणली आहे. याशिवाय आणखी दोन पैलू उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.

जातिभेद निर्मूलनाच्या चळवळीतील एक महत्त्वाचे, परंतु काहीसे दुर्लक्षित राहिलेले नाव आहे महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे . त्यांचा या बाबतीतील काहीसा वेगळा दृष्टिकोन आणि त्यांनी केलेले प्रयत्न यांचाही ऊहापोह या अंकाद्वारे करीत आहोत. तसेच जातीवर आधारलेले आरक्षण, त्या विषयाचा निव्वळ राजकीय लाभ उठविण्याचा संकुचित प्रयत्न आणि त्याचा जातिद्वेष वाढविण्यातच झालेला परिणाम हा सगळाच प्रदेश गेल्या अनेक वर्षांपासून गुंतागुंतीचा राहत आला आहे. या विषयाचा आपल्या पीएच.डी. साठीच्या संशोधनातून मागोवा घेणारे प्रा. अविनाश कोल्हे यांचा लेखही या अंकात आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. सर्व बाबतीत उपेक्षितपणाचा सर्वात जास्त चटका सोसणारा समूह आहे भटक्या-विमुक्त जमातींचा. दारिद्र्य, अशिक्षा, अंधश्रद्धा, गुन्हेगारी यांच्या घट्ट विळख्यांनी आवळलेला हा बांधवसमूह अकिंचन, अनिकेत, असहाय बनून वंचितपणाच्या निम्नतम पातळीवर जीवन जगतो आहे. गेली अनेक वर्षे या बांधवांच्या सर्वांगीण उन्नतीचा सार्थक आणि विराट प्रयत्न करणारे कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांनी भटके - विमुक्त आणि त्या निमित्ताने 'जात पंचायत' हा आज ज्वलंत बनलेला विषय हळूवार उलगडून दखविला आहे. तर या सगळ्याच

संपादकीय पान क्र. २७ वर पुढे....

राष्ट्रीय सौर दिनदर्शिका

श्रावण ,शक संवत १९३९

एक राष्ट्र-एक ध्वज, एक राष्ट्रगीत, एक राष्ट्रीय चिन्ह, एक भाषा, एक कायदा व एक कालगणना

वार	दिनांक	तिथी	दिनविशेष	ग्रेगोरीयन
रवि.	१श्रावण	आषाढ दर्श अमावास्या	दिपपूजा	२३ जुलै २०१७
सोम.	२	श्रावण शुक्ल प्रतिपदा	मराठ्यांनी राक्षसभुवन येथे निजामाचा प्रचंड पराभव केला. श.१६८५	२४
मंगळ.	३	द्वितीया	मराठावीर राणोजी शिंदे यांचे पुण्य स्मरण. शके १६६७	२५
बुध.	४	तृतीया	विनायक चतुर्थी	२६
गुरु.	५	चतुर्थी	नागपंचमी/संभाजीराजे यांनी पोर्तुगीजांची जहाजे पकडली. शके १६०४	२७
शुक्र.	६	पंचमी	श्रीकृष्णांनी कालिया नरसर्पाचा पराभव केला.	२८
शनि.	७	षष्ठी		२९
रवि.	८	सप्तमी	विख्यात रामभक्त महाकवी तुळसीदास यांची जयंती. शके १४५३	३०
सोम.	९	अष्टमी	विख्यात जगन्नाथ शंकरशेठ यांचे पुण्यस्मरण. शके १७८७	३१
मंगळ.	१०	नवमी	गुरू ब्रह्मेन्द्रस्वामींची पुण्यतिथि. शके १८६७	१ ऑगस्ट २०१७
बुध.	११	दशमी	क्रांतिवीर सुभाषचंद्र बोस यांची पुण्यतिथी. शके १८६७	२
गुरु.	१२	पुत्रदा एकादशी	संत विसोबा खेचर यांची पुण्यतिथी. शके १२३१	३
शुक्र.	१३	द्वादशी		४
शनि.	१४	त्रयोदशी	मराठेशाहीतील सखारामबापू बोकिल यांचे पुण्यस्मरण शके १७०३	५
रवि.	१५	चतुर्दशी	क्रांतिकारक कुदिराम बोस यांचे पुण्यस्मरण. शके १८३०	६
सोम.	१६	पौर्णिमा	नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन	७
मंगळ.	१७	कृष्ण प्रतिपदा	जगप्रसिद्ध रामकृष्ण परमहंस यांची पुण्यतिथि. शके १८०८	८
बुध.	१८	द्वितीया		९
गुरु.	१९	तृतीया		१०
शुक्र.	२०	चतुर्थी	संकष्ट चतुर्थी	११
शनि.	२१	पंचमी	मराठायोद्धा सदाशिवराव भाऊ यांनी दिल्ली जिंकली. शके १६८२	१२
रवि.	२२	षष्ठी		१३
सोम.	२३	सप्तमी	श्रीकृष्ण जयंती, जन्माष्टमी	१४
मंगळ.	२४	अष्टमी	गोपालकाला/संत ज्ञानेश्वरमहाराजांची जयंती, शके ११९७	१५ स्वातंत्र्यदिन
बुध.	२५	नवमी		१६
गुरु.	२६	दशमी		१७
शुक्र.	२७	अजा एकादशी		१८
शनि.	२८	द्वादशी/त्रयोदशी	भगवद्भक्त सेना न्हावी यांचे पुण्यस्मरण. शके ११७०	१९
रवि.	२९	चतुर्दशी	पुण्यशील राणी अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी. शके १७१७	२०
सोम.	३०	पिठोरी अमावास्या	पोळा/आरमार अधिकारी सेखोजी आंग्रे यांचे पुण्यस्मरण. शके १६५५	२१
मंगळ.	३१	भाद्रपद शु. प्रतिपदा	मराठा योद्धा सदाशिवराव भाऊ यांची जयंती. शके १६५२	२२

भारतीय सेनादलातील तीनही दलातील सर्व सैनिकांच्या सन्मानार्थ

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।।

– श्रीमद्भगवद्गीता अध्याय २, श्लोक ३७

अर्थ : जर युद्धात तू मारला गेलास तर तुला स्वर्गाची प्राप्ती होईल. आणि जर युद्धात तुझा विजय झाला तर पृथ्वीचे राज्य भोगशील. म्हणून हे कुन्तीनंदन ! तू युद्धाचा निश्चय करून सज्ज हो.....

राष्ट्राने गौरविलेले शौर्याचे मानकरी

हवालदार मेजर पिरू सिंग

टिथवालचा सिंह

प्रथम परमवीर चक्र

जुलै १९४८ ची गोष्ट. टिथवाल सेक्टरवर भारतीय सेनेने आक्रमक हल्ले बोलाविले होते. डोंगर माळांतून जाताना ६ राजपुताना रायफलसच्या एका कंपनीवर जोराचा गोळ्यांचा वर्षाव झाला. कंपनी हवालदार मेजर पिरू सिंगने आपली माणसे मशिनगन मार्‍याखाली दबून गेल्याचे पाहिले. त्याला जिवाची चीड आली व 'राजा रामचंद्र की जय' अशा घोषणा करीत त्याने शत्रूच्या मोर्चावर हल्ला केला. हातगोळ्यांच्या तुकड्यांनी त्यांच्या अंगावर जाळीच उठवली. परंतु ते त्याला मागे हटण्याचे कारण वाटले नाही. त्याने मशिनगनधार्‍यांना बायोनेटने खतम केले व मोर्च्याचा कब्जा घेतला. तशाच रक्तबंबाळ अवस्थेत तो शत्रूच्या दुसर्‍या मोर्च्यावर रांगत गेला. तेथे पोहोचल्यावर त्याने एका खंडारीत उडी घेतली व ती पण मशीनगन ताब्यात घेतली. तेथून बाहेर पड ून तो आणि एका मोर्च्यावर जाण्यासाठी वर येत असता त्याच्या डोक्यात एक गोळी लागली.

तशाही स्थितीत त्याने शत्रूच्या मोर्च्यावर हातगोळा फेकलाच. पण मग त्याच्या देहाने विश्रांतीच घेतली.

शत्रूच्या समोर लढताना अतुलनीय धैर्य व शौर्याबद्दल कंपनी हवालदार मेजर पिरुसिंगला मरणोपरांत 'परमवीर चक्राने' भूषविण्यात आले.

सद्गुरु

- स्वामी गोविंददेव गिरि महाराज

भवसागस - भवारण्य - भवरोग

'भवसागर' हा शब्द तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तसा अपरिचित नाही. हा सारा विश्वाचा पसारा, याला भवसागर म्हणतात. या विश्वाच्या पसाऱ्याला कुणी 'भवारण' म्हटलं आहे, तर कुणी 'भवरोग' म्हटलं आहे. या सर्व शब्दछटांतून या सृष्टीबद्दलचा एकेक वेगळा विचार व्यक्त केलेला आहे.

ज्यांनी विश्वाला 'भवसागर' म्हटलं, त्यांना म्हणायचं असं असतं की, जीवन हा प्रवास आहे. ही वस्तुस्थिती आहे. पण हा प्रवास भूमीवरचा नाही. सागर-प्रवास आहे. सागरात 'खाली पाणी नि वरती आकाश' अशी स्थिती असते. कुठून निघालो हे कळत नाही. कुठल्या दिशेनं प्रवास चालू आहे, नि किनारा किती दूर आहे, हेही कळत नाही. रस्ता नाहीच. होकायंत्र वापरून आपण आपला रस्ता निश्चित करायचा असतो. शिवाय सागराच्या भयानक लाटा, वादळं यांना तोंड द्यायचं असतं! - हा प्रवास संपायचा कधी? कसा? - प्रतिक्षणी भीती वाटते, जीवननौका बुडणार तर नाही? कारण तिच्या तळात एक छिद्रही आहे. नौकेत पाणी शिरत असतं. ते उपसावं लागतं. असा हा 'भव-सागराचा' 'प्रवास!'

दुसऱ्यानं म्हटलं, हे 'भवारण्य' आहे. अरण्यातून वाटचाल करणं अवघडच असतं! पायवाटा नाहीत. दाट अरण्यातही दिशा कळत नाही. या भवारण्यातील वाटचालीला काय म्हणावं, ते कळत नाही. वृक्ष-वेली-फुलं यांनी अरण्य बहरलेलं असतं. हवी तेवढी फळं, मुळं, कंदमुळं मिळतात. रानचा मेवा सुखावून जातो. पावला-पावलावर स्वच्छ निर्झर वाहात असतात. शुक-सारिका-मोर- यांच सौंदर्य, कूजन मोह पाडतं. पण त्याचबरोबर हिंस्त्र पशू केव्हा अंगावर तुटून पडतील सांगता येत नाही, जळवा, लाल मुंग्या इत्यादी कीटक लचके तोडतात. काही सोबत मिळाली नि ती चांगली असली तर प्रवास 'हसत-खेळत' होतो, सोबतही त्रासदायक असली तरी ती वेगळीच डोकेदुखी असते. म्हणून या भवारण्यातून जीवनाची वाटचाल करताना प्रश्न पडतो की, 'संसार सुखमय आहे की दुःखमय? - अमृतमय आहे की विषमय?

तिसऱ्यानं म्हटलं, 'हा भवरोग' आहे. रोग स्वास्थ्य बिघडवतो. बेचैन करतो. हळूहळू विनाशाकडे नेतो. 'जीवन' हा 'भव-रोगच' आहे; कारण'जन्मलिया दिवसे। हो लागे मरणाचि ऐसे।' जन्मल्या दिवसापासून अखंड मृत्यूचीच तर वाटचाल होते! अनेक प्रकारचे रोग असतात. तुम्ही म्हणाल, रोगावर अनेक औषधेही असतात!उपचारही असतात! - पण माझ्या मनात येतं, 'ही औषधे' नि 'हे उपचार' यात पारंगत झालेले, तज्ज्ञ, बडे-बडे पदवीधर, विख्यात 'डॉक्टर' स्वतःच केव्हा -ना-केव्हा मरतातच की! म्हणजे 'भव-रोग' सर्वांनाच होतो. जीवन भवरोगानं ग्रस्त आहेच!- जीवन तरी 'स्वस्थ' आहे का? इथं 'स्वास्थ्य' आहे का? मुळीच नाही. 'हे हवं आहे', 'ते हवं आहे!', 'अमकं मिळवायला हवं', 'अमकं कमी पडत आहे'! शेवटपर्यंत कोणती ना कोणती वासना पूर्ण करण्यासाठी धडपडत राहायचं आहे. एवढ्या नद्या अखंड पाणी ओतत असतात, पण सागर'दु-र्भर' असतो. 'पोट' नि 'मन' ही सुद्धा सागरासारखी दुर्भरच! कधीही तृप्ती नाही! अपूर्णता, सदैव भुकेलेपण, वखवख हे जीवनाचं वैशिष्ट्यच आहे. एक रोग असतो. त्याचं नाव 'भस्म-रोग'! कितीही खा, या गृहस्थाचं पोट भरतच नाही. अर्ध्या-अर्ध्या तासानं जेवायला हवं! इतका भुकेला होतो, कासावीस होतो की, चार-सहा दिवसांचा उपाशी आहे.' भव-रोग हा असाच आहे. जीवनाला जणू 'भस्मरोग' झालाय वासनांची कितीही पूर्तता करा, मागणी सरतच नाही! या 'वासना' हाच 'भवरोग' आहे!

भव-सागर असो, अरण्य असो वा रोग असो, केव्हातरी मनात येतं, हे सारं संपायला हवं. पण माणसं विचार करीत नाहीत. बालपण अज्ञानात, खेळण्यात जातं. तारुण्य मस्तीत जातं. म्हातारपण येतं, त्यावेळी मनात येतं, 'संपलं की आयुष्य!' काय केलं आपण जन्माला येऊन? तारुण्यात क्षमता असते, पण विवेक नसतो. वृद्धापकाळात विवेक जागृत होतो, पण क्षमताच नसते!

अशी जीवनाची शोकान्तिका होऊ नये.

यावत् जरा दूरतः

भगवान शंकराचार्य म्हणतात, 'यावत् जरा दूरतः' - जोपर्यंत म्हातारपण दूर आहे, म्हणजे अंगात रग आहे, क्षमता आहे, तोपर्यंतच या भवसागरातून पार पडण्याचा प्रयत्न करायला हवा. नाहीतर हे 'भवचक्र' असंच चालत राहील. 'पुनरपि जननं पुनरपिमरणं । पुनरपि जननीजठरे शयनं। इह संसारे घोरे----'! जन्म, मरण - पुनः जन्म, मरण, हे चक्र चालूच राहील! हाच 'घोर संसार'!

परंतु अनेकांना या संसाराची भयानकता जाणवत नाही! विवेक जागा झाला तरच मनुष्य यातून सुटण्याचा विचार करतो. एरव्ही 'शेणामध्ये किडे, बांधोनि राहती वाडे'! शेणकिड्यांना त्याचा कंटाळा येत नाही. ज्ञानदेव विचारतात, 'सांगे पूयपंकीचे किडे, काय चिळसी घेती? पुवात लोळणाऱ्या किड्यांना त्याची

किळस येत नाही. ज्याला कंटाळा येईल, किळस येईल, तो त्यातून सुटण्याची धडपड करील.

म्हणौनि होई तू योगी

या भवसागरातून पार पडण्यासाठी, या भवरोगातून मुक्त होण्यासाठी अंगात त्राण आहे, तोच तपस्या करायला हवी. नंतर करू, एवढी काय घाई आहे, असं म्हणणं बरोबर नाही. म्हातारपण तरी तुमच्यासाठी राखून ठेवलं आहे, या म्हणण्यात काय अर्थ आहे? म्हातारपण तरी तुमच्यासाठी राखून ठेवलं आहे, याची काय खात्री? दूरदर्शनवर मालिका चालू आहे, 'एका श्वासाचं अंतर!'ते खरंच आहे. हा श्वास घेतला तरी पुढचा घेता येईल, याचा भरवसा नाही! म्हणून जे काही करायचं ते आताच! आजपासूनच!

'तप' करायला हवं. ही शिकवण आपल्या संस्कृतीनं आवर्जून दिली आहे. सृष्टी निर्माण करण्यापूर्वी ब्रह्मदेवानं तप केलं. बद्रीनाथ येथे भगवान नारायण पद्मासन घालून तप करीत आहेत, अशी मूर्ती आहे. म्हणजे भगवान विष्णू सृष्टीच्या पालनासाठी तप करतात. महेश कैलासवर तपच करीत असतात. महेश ध्यानमग्न आहेत. 'इथे मार्गीचा कापडी । महेशु अजुनी !' होय. भगवान शिव अजून 'परब्रह्मात वाटचाल' करीतच आहेत. याचा अर्थ असा की, ब्रह्मा-विष्णू-महेश ते तिन्ही देव तपाचरणे करतात.

जर आपणाला 'नवी सृष्टी' निर्माण करायची असेल, 'आपल्या सृष्टीचं पालन' करायचं असेल, वा या सृष्टीचा थांग लावायचा असेल तर तपाचरण अटळ आहे. सारे काही तपःसाध्य आहे.

देवांच्या परिश्रमावाचून विश्व-चक्र चालत नाही. इथं अखंड विश्व-नियमांचं परिपालन आहे! ते पालन कुणी अज्ञानानं, दुष्टपणानं खंडित केलं तर भगवान विष्णू पुनः पुन्हा अवतार घेतात. देव 'ऋतस्य गोप्ता' आहेत, असं वेद म्हणतात. म्हणजे विश्व-नियमांचं रक्षणकर्ते आहेत. भगवान विष्णू असं नाही म्हणत की, ' मी आता क्षीरसागरात निद्राधीन होत आहे. कोणीही माझी झोपमोड करू नका. मला विश्रान्तीची गरज आहे! तसं नाही. भगवान 'सज्जनांच्या रक्षणासाठी', 'दुर्जनांच्या विनाशासाठी' आणि 'धर्मसंस्थापना' करण्यासाठी पुनःपुन्हा अवतरतात, म्हणजेच 'तप' करतात. परिश्रम घेतात. भगवान महेश सर्व विद्या-कलांचे आदिगुरू आहेत. योगीराज आहेत. ज्ञानगंगेचा उगम शिव-मस्तकच आहे. असं असून ते अजूनही तपाचरण करतात.

याचा अर्थ असा की, देवांनाही प्रयत्नवाद चुकला नाही. म्हणून आपणही 'देवांना वाट पुसत' आपल्या जीवनाची वाटचाल करायला हवी.

प्रयत्नवाद आणि प्रारब्धवाद

प्रयत्न श्रेष्ठ की प्रारब्ध हा वादही बराच प्राचीन आहे. श्रीगीता प्रारब्धाला वीस टक्के मान्यता देते. काही गोष्टी नियतीच्या आधीन असतात. आपल्या हाती नसतात हे मान्य करावे लागते. पण ऐंशी टक्के प्रयत्नवाद स्वीकारायलाच हवा. धरणीकंप झाला, उल्कापात झाला, गारांचा वर्षाव झाला, प्रचंड वादळ झाले, तर आपण काय करू शकतो? आपलं सामर्थ्य कमी पडतं! पण असं क्वचितच घडतं. हे उत्पात घडतात नि त्यावेळी आपण काही करू शकत नाही, हे मान्य आहे. परंतु 'उत्पात' हा नियम नाही. 'ऋतुचक्र' हा नियम आहे. म्हणून शेती करणं, पशुपालन करणं, वास्तु उभारणं, धरणं बांधणं, विद्युत - जनित्रे निर्माण करणं - हे सारे उद्योग करायलाच हवेत. जीवन समृद्ध असावं. उत्पातांच्या भीतीने प्रयत्नवाद सोडू नयेत.

लौकिक जीवनात जसा प्रयत्नवाद हवा, तसाच आध्यात्मिक जीवनातही प्रयत्नवाद हवा. योगसूत्र सांगते 'साधना दीर्घकाळ' करावी लागते. इहलोकीचं जीवन असो, वा पारमार्थिक जीवन असो, अपयशानं खचता कामा नये. वैज्ञानिक एकेका संशोधनासाठी शेकडो प्रयोग करतात कंटाळत नाहीत. परिश्रम घेतात. वर्षानुवर्षे एकच ध्यास घेतात आणि एकदा 'नवा शोध' जगाला देतात. परमार्थातही अशीच तपस्या करावी लागते. आपल्याच अंतरंगात खोल बुडी मारावी लागते. हाही प्रवास सोपा नसतो. सर्वांत प्रदीर्घ अन्तर्यात्रा आहे. ही अन्तर्यात्रा प्रदीर्घ असेल, कित्येक वर्षे अंधारातच चाचपडत चालत राहावं लागत असेल, एवढंच नाही. या पारमार्थिक यात्रेतही अनेक अडचणी येतात. साधक निराश होतात. साधक मोहजालात गुंततात. भ्रष्ट होतात. 'रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग । अन्तर्बाह्य जग आणि मन।।' असा झगडा करावा लागतो. अनेक मोहाचे प्रसंग येतात. 'मोह' 'मोहकच' असतात. अधःपतित झाल्यानंतरच कळतं की, उगीच मोहाला बळी पडलो. पण खेचले जातो! तुकोबाराय म्हणतात, 'तुका म्हणे मना पाहिजे अंकुश। नित्य नवा दिस जागृतीचा।।'

पारमार्थिक वाटचाल करणाऱ्या साधकांची तपस्या अनेक कारणांनी भ्रष्ट होते. तपस्वी अधःपतित होतात. तपस्या भंग पावते. उंच शिखर गाठण्यासाठी हळूहळू चढत जात असता पाय घसरून गडगडत खाली यावं तसं होतं. हे सारे तपोभंगाचे प्रसंग येतात. पुनः पहिल्यापासून सुरुवात करावी लागते. पण निराश न होता, अधःपतित झालो तर खचून न जाता, पुनश्च तेवढ्याच उत्साहानं तपस्या करीत करीत 'परम पुरुषार्थ' प्राप्त करून घेणं, महत्त्वाचं आहे.

याबाबतीत विश्वामित्रांचं चरित्र खरोखरीच अत्यंत

प्रेरणादायी आहे. साधक निराश झाला, तपस्या करता करता मोहवश झाला, अधःपतित झाला, तरी पुनः उठून चालू लागणं, नि आपलं उद्दिष्ट पूर्ण करणं यासाठी विश्वामित्राचं चरित्र साधकांनी अवश्य डोळ्यासमोर ठेवावं. परम-पुरुषार्थाचा आदर्श विश्वामित्र हे आहेत.

चरित्र त्यांचे पाहा जरा

वसिष्ठांनी म्हटलं, 'प्रयत्नवाद शिकण्यासाठी कुठं जगात हिंडायला नको. तुझ्या भाग्यानं हे ब्रह्मर्षी विश्वामित्र इथं उपस्थित आहेत. विश्वामित्र म्हणजे प्रयत्नरूप यज्ञाची उफाळती ज्वालाच आहेत. 'केला जरी पोत बळेचि खाले। ज्वाला तरी ती वरती उफाळे!' याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे विश्वामित्र! कदाचित जगाच्या इतिहासात एवढं पिळदार नि जिद्दी व्यक्तिमत्त्व दुसरं सापडणं कठिण!

त्यांच्या जीवनातील घटनांचं एक धावतं चित्र तुला दाखवतो. ऐक.

विश्वामित्रांचं वसिष्ठ-आश्रमात आगमन

विश्वामित्र तसे क्षत्रिय ! राजे! एक दिवस मृगया करण्याकरिता एका अरण्यात आले. बरोबर बरेच सैनिक होते. सावजांचा पाठलाग करीत ते अरण्यात खूप भटकले. तहानेनं नि भुकेनं व्याकुळ झाले. जवळच वसिष्ठांचा आश्रम होता. सैन्य नि मंत्री आदि मागं ठेवले आणि विश्वामित्र दोघा-तिघा प्रमुख अधिकाऱ्यांसह आश्रमात आले. वसिष्ठांनी राजे विश्वामित्रांचं नि अन्य अधिकारी मंडळींचं यथायोग्य स्वागत केलं. प्रधानानं सांगितले, 'आम्ही मृगयेसाठी आलो होतो. आता क्षुधा-तृष्णेनं व्याकुळ झालो आहोत. सैनिकांना मागं ठेवून आम्हीच आलो आहोत!'

हे ऐकताच वसिष्ठांनी म्हटलं, ''आपण सारेच अतिथी आहोत. असू द्या सैन्य कितीही! बोलवा त्यांना.''

विश्वामित्रांनी निरोप पाठवून सैनिकांनाही आश्रमात बोलावलं. त्या आश्रमाला सर्वांची 'यथा अधिकार' सोय झाली. खाद्यं, शीत-पेयं, फराळ, दूध - हवं ते, हवं तेवढं! आग्रहपूर्वक भोजनं झाली. राजा विश्वामित्राची तर विशेष बडदास्त ठेवली होती. सैनिक, अधिकारी खूष झाले. पण विश्वामित्राच्या मनात वेगळाच विचार आला. ब्राह्मणाच्या आश्रमात एवढा थाट, एवढं वैभव कसं? स्वाभाविक रीतीनं त्यानं विश्रांतीच्या वेळी विचारलं, 'आपण इतक्या अल्प वेळात एवढी उत्कृष्ट व्यवस्था कशी केली? हे मला मोठं कोडं पडलंय!

वसिष्ठांनी म्हटलं, ''त्यात कोडं काही नाही.कामधेनू नंदिनीची मुलगी शबला माझ्याकडे आहे. ती कामधेनूच, हवते हवं तेवढं देते. मला यज्ञ -यागासाठी तिचा उपयोग होतो.''

''तर मग ती मग ती कामधेनू मला द्या. मला तिचा अधिक उपयोग आहे!''

वसिष्ठ हसले, म्हणाले, 'राजा, धर्माला सोडून तू याचना करीत आहेस. कामधेनू ही दान करता येत नाही. दुसरं असं की, तू क्षत्रिय आहेस. क्षत्रियांनी दान द्यायचं असतं, हात पसरायचा नसतो! दानाची याचना करण्याचा तुला अधिकार नाही!''

झालं . सर्वांच्या देखत अपमान झाला म्हणून राजा चिडला. ओरडून म्हणाला, ''ठीक आहे, तर मग क्षात्र -नीतीनं धेनू-हरण करतो! सामर्थ्य असेल तर विरोध करा!'

विश्वमित्रांनी सैनिकांना सांगितलं, 'ही धेनू घेऊन चला. कुणी अडवलं तर युद्ध करा!'

शबला हंबरू लागली. वसिष्ठांकडं धावत आली. वसिष्ठांनी म्हटलं, 'मी तुला 'जा' सांगत नाही. मी काय करू? तुला बळजबरीनं ते नेत आहेत. तूच तुझ रक्षण कर!'

त्याबरोबर शबला थरारली. तिनं केवळ हुंकार भरला. तिच्या अंगातून सैन्य बाहेर पडलं. थोड्याच वेळात विश्वामित्राचं सैन्य पराभूत होऊन पळत सुटलं. विश्वामित्रही आश्रमातून बाहेर पडला.

पण त्याला कामधेनू हवी होती. त्यानं तपस्या केली. शिवाला प्रसन्न करून घेतलं. शिवाकडून काही अस्त्रं प्राप्त करून घेतली. नि तो पुनः वसिष्ठांच्या आश्रमावर चालून आला. सैन्याची गर्जना नि युद्धाचा शंख फुंकलेला ऐकताच वसिष्ठ समजले. त्यांनी एक दर्भ उचचला, अभिमंत्रित केला नी अंगणात फेकला.

विश्वामित्रानं शेकडो अस्त्रांचे प्रयोग केले. विविध बाणांचा वर्षाव केला. पण सारी अस्त्रं त्या दर्भापर्यंतच येत आणि विझून जात. कुठलंही अस्त्र प्रभावी झालं नाही. तेव्हा विश्वामित्र हताश होऊन उद्गारला, ''धिक् क्षात्रबलं बलम् । ब्रह्मतेजो बलं बलम् !'' (या शस्त्रास्त्रांच्या सामर्थ्यांचा धिक्कार असो. तपस्येचं सामर्थ्य हेच खरं सामर्थ्य!!)

झालं. मनानं घेतलं. आपण 'ब्राह्मण' व्हायचं. 'ब्रह्मर्षीपद' मिळवायचं. विश्वामित्रानं लगेच राज्यत्याग केला. ध्येय ठरवणं सोपं असतं, पण त्याच्या प्राप्तीसाठी ध्येयमार्गाच्या आड येणाऱ्या गोष्टी कितीही चांगल्या नि नित्य सवयींच्या असल्या तरी मनानं टाकण्याची तयारी सोपी नसते. हे 'वैराग्य' आहे. विश्वामित्रानं जणू आव्हान स्वीकारलं. ब्रह्मर्षीपद मिळवायचं आहे, आणि ते मी मिळवीनच !

विश्वामित्रानं अरण्यवास पत्करला. घोर तपस्या सुरू केली. योगवासिष्ठकारांचा विश्वास आहे की, दृढ संकल्प नि एकाग्र चित्त यांनी प्राप्त होत नाही, असं विश्वास काही नाही. तपस्या कधीही विफल होत नाही. ब्रह्मदेव प्रकट झाले.

म्हणाले, 'उठा. आपण 'ऋषी' झालात!' हे ऐकून विश्वामित्रांचं समाधानं झालं नाही. त्यांनी पुनः घोर तपस्या सुरू केली.

असं कुणी तपस्या करू लागलं की, इंद्राला भय वाटतं! आपलं स्थान हा घेतो की काय? याला 'इंद्रपद' हवं आहे की काय? – छेः ! ते त्याला मिळता कामा नये. त्याचा तपोभंग झाला पाहिजे. विश्वामित्राची घोर तपस्या भंग करण्यासाठी इंद्रानं 'मेनका अप्सरा' पाठवून दिली. मेनका आली! ऋषींची सेवा करू लागली. पर्णकुटीची झाड-लोट! पाणी भरणं. सारवणं. दूध- फळं देणं! मेनका सुंदरच होती. शान्तपणे सेवा करीत होती. स्मितहास्यपूर्वक 'हवं-नको' पाहात होती. विश्वामित्रांना वाटलं, 'राहीना का! आपण आपल्या तपस्येत! षीच्या सेवेनं तपस्येला अधिक वेळ मिळतो! बिघडलं कुठं?

मेनकेनं आपण होऊन कोणतेही विभ्रम दाखवले नाहीत. तपस्वी जनांच्या शापाची तिला भीती वाटे. पण एक दिवस ती पावसात चिंब भिजली. तशीच पर्णकुटीत आली. तिनं त्या पर्णकुटीतच आपली वस्त्रं बदलली. विश्वामित्रांनी कधी नव्हतं ते आज तिच्याकडं पाहिलं. तिचं सौष्ठव, अंगकांता 'आज' त्यांना दिसली. ते तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहू लागले. मेनकेनं ती दृष्टी ओळखली. डोळ्यातले बदललेले भाव पाहिले. तिनं स्मित हास्य केलं.

झालं. विश्वामित्रांचं मन घुसळलं गेलं. मनात 'काम' प्रवेश झाला. कामाला 'मन्मथ' म्हणतात. 'मनाचं मंथन' करणारा तो मन्मथ !

मेनका बरीच वर्षे राहिली. शकुंतलेचा जन्म झाला! मग विश्वामित्र एकदम जागा झाला. मेनकेच्या सहवासात आपला तपोभंग झाला. त्याचा तपोभंग करायलाच तर ती आली होती. ती शकुंतलेला टाकून स्वर्गात निघून गेली. विश्वामित्रानंही शकुंतलेचा स्वीकार केला नाही. तिला कण्व मुनींनी त्यांच्या आश्रमात वाढविली.

विश्वामित्रांनी पुनः पहिल्यापासून तप करायला आरंभ केला. आता ते सावध झाले होते. लक्षात आलं, ही 'इंद्राची नीती' आहे. त्यानं आपणाला पथभ्रष्ट केलं. विश्वमित्रांनी ते स्थानही सोडलं. ते दक्षिणेत गेले. पुनः तप सुरू झालं.

इंदानं पुनः मेनकेला विचारलं. ती म्हणाली, 'नको, आता मी जात नाही. मला पाहिलं तरी ते शाप देतील!' मग इंद्रानं रंभेला पाठवलं. रंभा आली. विश्वामित्रांचे तपस्येवरून लक्ष उडावं म्हणून तिनं काही विभ्रम केले. काही हावभाव केले. कटाक्ष फेकले. पैंजणांचं रूणुझुणू निनाद काढला. विश्वामित्र संतापला. त्यानं रंभेला शाप दिला तरी ती हसली. म्हणाली, 'आपण शाप दिलात! मी शाप भोगेन. पण आपण क्रोधाविष्ट झालात. शाप देण्यानं आपला पुण्यक्षय झाला आहे. आपली तपस्य भंग पावली. माझं कार्य सफल झालं आहे!' तिनं नाटकी आविर्भावानं नमस्कार केला नि ती निघून गेली.

विश्वामित्र भानावर आला. मेनकेनं दहा-बारा वर्षांच्या तपावर पाणी ओतलं. नंतर या रंभेनं दहा-बारा वर्षांची तपश्चर्या वाया घालवली. थोडी नाहीत, जवळपास पंचवीस वर्षांचे परिश्रम वाया गेले. एकदा कामानं नि एकदा क्रोधानं! 'काम-क्रोध आड पर्वत ।पैल उभा भगवंत!!' खरंच आहे ते. हे काम-क्रोध पर्वतासारखे वाटेत उभे आहेत. पलीकडे भगवंत उभे आहेत. पण या पर्वतांना ओलांडलं पाहिजे.

विश्वामित्रांनी हेही स्थान सोडलं. अन्य स्थानी 'पनश्च हरिः ॐ' पासून प्रारंभ केला. न कंटाळता. सोपं नव्हतं. पराभूत झाले, पण मनानं खचले नाहीत. ती उमेद, ती जिद्द, ती महत्त्वाकांक्षा तशीच होती. 'तपोभंग' कामक्रोधांनी झाला', हे त्यांनी ओळखलं. मनाशी दृढ संकल्प केला. आता पूर्ण सावध राहायचं. काम-क्रोधांची इवलीशी लहर उठू द्यायची नाही.

काही वर्षं गेली. ब्रह्मदेवांनी येऊन म्हटलं, 'महर्षी, उठा!' – पुनः तप! 'महर्षी? केवळ महर्षी? – नाही थांबायचं ! मला ब्रह्मर्षी व्हायचंय!'

इंद्रानं स्वतः वेष पालटला, वनवासी वेष घेतला. विश्वामित्रांच्या अंगावर त्यांन मुद्दाम केर-कचरा फेकला. मुद्दाम काही अद्वातद्वा बोलला. विश्वामित्रांची भुवई वक्र झाली नाही. शांती ढळली नाही. ते शान्तपणे आपल्या आसनावर जाऊन बसले.

त्यानंतरही ब्रह्मदेवानं येऊन प्रसन्नपणे हसत, 'ब्रह्मर्षी, आता उठा. आपण 'ब्रह्मर्षीपद' प्राप्त करून घेतलं आहे', असं म्हटलं. देवांनी विश्वामित्रांचा सत्कार केला. ऋषी-मुनींनी श्रद्धा –आदरपूर्वक 'ब्रह्मर्षी-विश्वामित्र' असं म्हटलं. विनम्र प्रणिपात केला. पण विश्वामित्रांचं समाधान झालं नाही. केवळ वसिष्ठांनी अजूनही त्यांचा उल्लेख 'ब्रह्मर्षी' म्हणून केला नाही. ही गोष्ट विश्वामित्रांना सलत राहिली. असं का? ऋषि-मुनी, देव माझं 'ब्रह्मर्षिपद' मान्य करतात, मग वसिष्ठ का करीत नाहीत? आता राग नाही आला; पण मनात खटकलं, कुतूहलही वाटलं, 'वसिष्ठांनी का मान्य करू नये?'

वसिष्ठांनाच स्पष्टपणे विचारावं म्हणून विश्वामित्र निघाले. रात्र झाली. ती शरद्-पौर्णिमाच होती. स्वच्छ चांदणं पडलं होतं. पर्णकुटीच्या बाहेर सारवलेल्या अंगणात वसिष्ठ- अरुंधती आसनावर बसून गप्पा मारीत होते. विश्वामित्रांना ती दोघं दिसत होती. ते आडोशाला होते. वसिष्ठ-अरुंधतींना ते आल्याची कल्पना नव्हती. ते काय बोलत आहेत, हे कुतूहलानं विश्वामित्र ऐकू लागले – 'अरुंधती, कसं सुंदर चांदणं पडलं

आहे. सांग, कसं दिसतं?

'हे शरद्-पौर्णिमेचं चांदणं ना - टिपुर, पिठासारखं पडलं आहे, अगदी तांदळाची पिठी जणू !'

वसिष्ठ हसले म्हणाले, 'तू काही स्वयंपाकघराच्या बाहेर पडली नाहीस! मी सांगू, हे चांदणं कसं दिसत आहे - हे विश्वामित्रांच्या तपश्चर्येसारखं दिसत आहे , स्वच्छ, शीतल, प्रकाशमान!''

हे ऐकून विश्वामित्र जागेवरच शहारले. तेवढ्यात अरुंधतीनं विचारले, ''एवढा जर तुम्हाला त्यांच्याबद्दल आदर आहे, तर तुम्ही त्यांना 'ब्रह्मर्षी' का नाही म्हणत?

विश्वामित्रांच्या मनात आलं, 'बरं झालं, अरुंधती वहिनींनींच प्रश्न विचारला. अगदी माझ्या मनातला प्रश्न!''

वसिष्ठ, म्हणाले, 'अरुंधती, अगं, विश्वामित्र ब्रह्मर्षी कधीच झाले आहेत. माझ्या म्हणण्यावर ते थोडेच अवलंबून आहे. ते पद त्यांनी मिळवलं आहे. कुणाच्याही मान्यतेची आवश्यकताच काय? - ज्ञान ज्ञानच असतं, अग, आत्मा 'स्वयंवेद्य' असतो, म्हणतात ना! याचा अर्थ आत्मज्ञानानं आत्मतृप्ती, आत्मानंद, शांती प्राप्त होते. ती मला मिळाली आहे की नाही, हे काय मी कुणाला विचारायला जावं? 'स्वयंवेद्य आत्मानुभूती' मला मिळाली आहे का हो? असं मी कुणाला विचारायला जायला हवं का? कुणी तसं म्हटलं, तसं प्रमाणपत्र दिलं तर मला 'आत्मानुभूती' मिळाली आहे, असं मी मानावं का? याचा अर्थ असा की, माझ्या आत्मानुभूतीला, शांतीला इतरांनी मान्यता द्यावी, ही वासना शिल्लक आहे. खरं म्हणजे ज्ञान तर व्हावचं, पण ज्ञान मुरलं तर ज्ञानाचीही जाणीव राहात नाही! आत्मानुभूती प्राप्त झालेली व्यक्ती आत्मसंतुष्टही असते. इतरांच्या मान-मान्यतेची कामना करीत नाही. एवढ्या तपस्येनंतर हा अट्टहास, हा आग्रह हवा कशाला? हीही वासनाच आहे. हा इवलासा उणेपणा राहिला आहे. इतरांनी म्हणावं, मग मी ज्ञानी ठरावं, मग मला 'स्वरूपानंद' लाभला, असं मानावं', हेच हास्यास्पद आहे. खर तर हा झिरझिरीत पडदा आड आहे. हाही फाटायला हवा आहे! हा पडदा फाटताच त्यांच ब्रह्मर्षिपद माझ्या मान्यतेवाचून प्रकट होईल!'

हे ऐकताच विश्वामित्र ओशाळले. 'होय, खरंच! - अहो, मी शान्ती मिळवली आहे का हो? असं कुणाला विचारायला हवं का? - अहो, मला 'स्वरूपानंद' लाभला आहे, असं म्हणा की!' असा आग्रह, अट्टहास हे एक प्रकारचं गालबोटच! विश्वामित्रांच्या डोळ्यातून अरुधारा वाहू लागल्या. त्या अश्रुधारेत अनुतापही होता नि आनंदही होता. वसिष्ठांनी जणू हात देऊन ज्ञान शिखरावर ओढून घेतलं, नाहीतर पुनश्च खोल दरीत कोसळण्याची भीती होती. त्यांनी धावत जाऊन वसिष्ठांचे पाय धरले. घट्ट घट्ट पाय धरले. गदगद होऊन बोलेनासे झाले. थरथर कापत राहिले. त्यांनी वसिष्ठांपुढं हात जोडले.

वसिष्ठांनी विश्वामित्रांना बसल्या बसल्याही मिठी मारली. त्यांच्या दंडावर , पाठीवर थोपटलं. हसत हसत म्हणलं, हे ब्रह्मर्षी, मी आपलं मनःपूर्वक स्वागत करतो.

वसिष्ठांनी हे सारं श्रीरामांना सांगितलं नि म्हटलं, ''राम, विश्वामित्र म्हणजे प्रयत्नवादाचा एक उच्चतम मानदंड आहेत. हे धवल चरित्र ध्यानी ठेव, स्खलन आलं तरी थांबले नाहीत, माघार घेतली नाही, राम, पुरुषार्थाच्या जोरावर मोक्षाचं दार असं उघडतं!''

शिस्तबद्ध क्रांतीच्या दिशेने मराठा तरुणाई

- चिंतामण पाटील

मराठा समाजाला संघटित करताना दुसऱ्या जातीविषयी दुर्भावना असू नये. विधायक कामांचा आदर्श तरुणाईसमोर ठेवला जावा. निःस्वार्थी भावनेने राजकारण करता येऊ शकतं. विविध जिल्ह्यांत शेतकऱ्यांसाठी अॅग्रोवर्ल्ड कृषी प्रदर्शन आयोजित केली जातात. नैराश्याने वेढलेल्या मराठा समाजातील शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी विविध प्रकारच्या अशा विधायक उपक्रमांची गरज आहे.

बीड असो अगर जळगाव, सगळीकडच्या मराठा क्रांती मोर्चांमधील लाख-लाख समाजबांधवांची उपस्थिती जशी लक्षवेधी, त्यापेक्षाही लक्ष वेधले ते मोर्चाच्या शिस्तीने, धाराशिव, औरंगाबादच्या मोर्चापासून सुरू झालेली ही शिस्तीची परंपरा नागपूरच्या शेवटच्या मोर्चापर्यंत टिकून राहिली. दुष्प्रवृत्तीला नेस्तनाबूत करण्यासाठी नि समाजजागृतीसाठी उपसलेलं मोर्चाचं हे शस्त्र अनेक अर्थांनी यशस्वी ठरलं, असं म्हणावं लागेल. कोपर्डी घटनेमुळे संतप्त मराठा समाजाने शांततेच्या मार्गाने राबवलेली ही मोहीम होती. त्यातल्या आरक्षणाच्या मागणीमागे नव्या पिढीच्या मनातल्या बेरोजगारीची धग जाणवत होती, तर अॅट्रॉसिटी रद्दच्या मागणीमागे या कायद्यामुळे बेजार गावकरी दिसत होता. या शिस्तबद्ध मोर्चांच्या माध्यमातून उद्याच्या क्रांतीची बीजं पेरली गेली आहेत.

कोपर्डीच्या निमित्ताने

मराठा क्रांती मोर्चामागची प्रेरणा कोपर्डी येथल्या भगिनीवरील बलात्काराची घटना ठरावी हे दुर्दैव. या घटनेचा निषेध म्हणून आयोजित मोर्चाच्या निमित्ताने मग आरक्षण आणि अॅट्रॉसिटी कायदा रद्द करण्याची मागणी पुढे आली. मोर्चात सहभागींचे म्हणणे असे आहे की मोर्चासाठीचे मुद्दे कोण्या संघटनेने अगर राजकीय पक्षाने पुरवलेले नाहीत; अॅट्रॉसिटीमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडते, तर आरक्षणाअभावी सक्षम असूनही सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी नाकारली जाते! मोठ्या संख्येने असूनही विविध कायद्यांनी मराठा समाजाला अडचणीत आणले. ह्या दुर्दैवी फेऱ्यातून सुटका व्हावी, म्हणून हे मुद्दे पुढे आले. एकूण अॅट्रोसिटी नी आरक्षण हे मुद्दे तीव्र समाजभावना आहेत, हे मोर्चेकऱ्यांच्या बोलण्यावरून जाणवले.

मराठा आरक्षण आताच का?

राज्यात फडणवीसांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार सत्तेवर आल्यानंतरच आरक्षणाचा मुद्दा का पुढे आला? या सरकारला अडचणीत आणण्यासाठी हा खटाटोप आहे का? काही राजकीय मंडळींच्या वक्तव्यांमुळे यामागे राजकारण

असल्याचा संशय येऊ लागला होता. मोर्चाचे भांडवल करून आंदोलन हायजॅक करण्याचा प्रयत्न दिसू लागला होता. परंतु मोर्चाचं नेतृत्व सकल समाजाच्याच हाती असल्याने तसं घडलं नाही.काहींनी आपला दूषित वैचारिक अजेंडा लादण्याचाही प्रयत्न करून पाहिला. मात्र तसं झालं नाही. मोर्चा कोणाच्या बॅनरखाली नव्हता, त्याला संघटनेनं वा पक्षाचं लेबल नव्हतं. मागच्या सरकारने राजकीय फायदा समोर ठेवून विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर घाईगडबडीत निर्णय घेतला. न्यायालयाने हे आरक्षण रद्द ठरवल्यानंतर न्यायालयीन लढाईमुळे आरक्षण मिळणार नाही असं दिसू लागलं असलं, तरी या सरकारने मराठा आरक्षणाला प्राधान्य दिलं पाहिजे, आरक्षण न्यायालयाच्या अधिकार कक्षेत येत असलं, तर सरकारने आरक्षणासाठी प्रामाणिकपणे न्यायालयात बाजू मांडावी यासाठीचा दबाव निर्माण करण्यात मोर्चे यशस्वी झाले. विक्रमी संख्या असलेले मराठा क्रांती मोर्चे न्यायालयाचा निर्णय बदलू शकत नाहीत हे जरी खरं असलं, तरी शासनाला समाजभावनेचा विचार करावा लागेल व शासनाला आरक्षण द्यावंच लागेल, हा विचार मोर्चांच्या माध्यमातून गावपातळीपर्यंत पोहोचला.

काय साध्य झालं?

मराठा क्रांती मोर्चाने काय साध्य झालं? असा प्रश्न जेव्हा जेव्हा विचारला जाईल, त्यावेळी पहिलं उत्तर असेल-बहुसंख्येने असलेला एक समाज राजकीय नेतृत्वाशिवाय एकत्र येऊ शकला, पाटीदार, जाट, गुर्जर आंदोलनांमुळे त्या त्या राज्यात आंदोलनकर्त्यांमुळे दहशतीचं वातावरण तयार झालं होतं. मराठा मोर्चाने मात्र मूकमोर्चांतून संताप व्यक्त करता येतो नि त्याचा

पृष्ठदाता: श्री. अतुल राजाराम अष्टेकर, पुणे

समाजावर, शासनावर प्रभाव पडू शकतो हे सिद्ध करून दाखवलं. दलित असल्याचं भांडवल करून ॲट्रॉसिटी कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्यांना पहिल्यांदाच आव्हान देण्यात आलं. याशिवाय आणखी एक गोष्ट या मोर्चांमुळे समोर आली, ती म्हणजे शेती आणि राजकारण यांच्या अवतीभोवती एकवटलेल्या मराठा समाजाची आर्थिक घडी कमकुवत असून नवी पिढी रोजगारासाठी चाचपडत असल्याचं उघड झालं.

राजकीय संस्थानिकांनी समाज लुटला

८० च्या दशकात बी.एड., डी.एड. झालेले असंख्य मराठा तरुण शेताचा एक तुकडा विकून आपल्या जिल्ह्यातील राजकीय नेत्यांच्या शाळेत डोनेशन देऊन शिक्षक झाले. या विनाअनुदानित शाळेत काहींनी पाच तर काहींनी दहा वर्षं फुकट शिकवलं. चेअरमन असलेल्या आपल्या नेत्यासाठी निवडणुकीत गावोगावी जाऊन मतं मागितली. त्याच्या घरच्या लग्नात पत्रावळी उचलल्या. काहींनी पीए म्हणून दिल्ली, मुंबईत त्यांची कार्यालयं सांभाळली. शाळेत अनुदान मंजूर झाल्याबरोबर त्या शिक्षकांचा पहिल्या वर्षाचा पगार चेअरमनने गिळला नि पुढचा पगार बँकेकडे गहाण ठेवून चेअरमननेच कर्जाचा बोजा चढवला. हे तरूण आपल्या मायबापाला उन्हात राबते ठेवून पुढच्या सुखी जीवनाच्या अभिलाषेपोटी चेअरमनकडे गहाण पडले होते. हे सगळे चेअरमन कोणत्या समाजाचे होते? सगळ्या महाराष्ट्राचं सर्वेक्षण केलं, तर हे सगळे शाळांचे संस्थानिक मराठा समाजाचे होते नि सगळे राजकारणी काँग्रेसचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे होते. अलीकडच्या दहा वर्षांत एका शिक्षकाच्या पदासाठी माध्यमिक विद्यालयात १५ ते २५ लाख इतकं डोनेशन मोजावं लागतं. या डोनेशनमधून गब्बर झालेल्या संस्थानिकांनी मराठे समाजाला लुटलं नाही का?

शेतकऱ्यांची पोरं दहा दहा लाख डोनेशन का मोजू लागले?

'शेती म्हणजे प्रत्यक्ष मरण', हाती धड भांडवल नाही, सिंचनाची फारशी सोय नाही, लहरी निसर्गामुळे कधी दुष्काळ, कधी अतिपाऊस तर कधी गारपीट. चार जणांच्या कुटुंबाची गुजराण होऊ शकेल अशी शक्यता दुरावली. मग नोकरी हाच यावरचा उपाय असून पडेल त्या नोकरीसाठी मराठा तरुणांनी गाव सोडायला सुरुवात केली.

अल्पशिक्षितांनी मुंबई, पुण्यासारख्या महानगराची वाट धरली नि वाट्टेल ते काम करायला सुरुवात केली. काहींनी वाहन परवाने काढून प्रवासी वाहतूक सुरू केली. ज्यांना शक्य होतं, त्यांनी डोनेशन भरून बी.एड. डी.एड. केलं. शिकून नोकरीच करायची असल्याने शेती विकून का असेना, त्यांनी लाखो रुपये डोनेशन द्यायची तयारी केली, कारण विविध कारणांमुळे शेती व्यवसाय परवडेनासा झाला होता. शेतकऱ्यांकडे ना पैसा, ना प्रतिष्ठा. या दोन्ही गोष्टी हव्या असतील, तर शेती सोडून नोकरीच केलेली चांगली, ही या पिढीची भूमिका झाली. त्यामुळेच त्यांनी नोकरी मिळवण्यासाठी लाखो रुपये देण्याची तयारी केली. शक्य होतं त्यांनी रोजगारासाठी शेतीशिवाय दुसरा पर्याय शोधला. जे शेतीसाठी मागे राहिले, ते उत्पन्नाअभावी कर्जात बुडाले. त्यातील काहींनी गळ्यात फास अडकवला किंवा विषाचा डबा तोंडाला लावला.

शेतकऱ्यांची टवाळकी होऊ लागली

शेतकरी म्हणजे समाजाचा पोशिंदा. परंतु महागाईची कारणं पुढे करून शेतकामाचे दर पाडण्याचं षडयंत्र सर्व पातळ्यांवर खेळलं जाऊ लागलं. जेव्हा कांद्याचे भाव घसरतात, तेव्हा शेतकऱ्याला 'तुम्ही फक्त कांदाच का लावता? ऊस का लावीत नाही?' दुग्धोत्पादनाचा दुय्यम धंदा का करीत नाही? कुक्कुटपालन का करीत नाही?' खान्देश, विदर्भ, मराठवाडा इथल्या शेतकऱ्याला 'कापूसच का लावता?' असे प्रश्न विचारले जाऊ लागतात. आहे त्या उत्पादनाला भाव मिळू नये नि ज्यातून उत्पादनाची शाश्वती नाही, ते करण्यासाठी उद्युक्त केलं जाऊ लागलं. त्यातून तो शेतकरी स्थिर होण्याऐवजी उद्ध्वस्त झाला, कर्जबाजारी झाला. असं करू नका, असं करा असं त्याला सांगणाऱ्यांनी शेतकऱ्याची टवाळकीच केली नाही का?

शेतकरी तरुणांचे विवाह थांबले

या दशकात शेती बेभरवशाची झाल्याने शेती करणाऱ्या तरुणांशी विवाहाला मराठा समाजातील मुली नकार देऊ लागल्या. त्यामुळे कधीकाळी वयाची विशीही न उलटता जिथे लग्नं उरकली जायची, तिथे आता तिशी उलटूनही तरुणांच्या अंगाला हळद लागत नाही. शेती बागायत असो अगर कोरडवाहू, शेतकरी नवरा नकोच अशी गावोगावच्या नवऱ्या मुलींची भावना झाली आहे. यातून तरुणांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होऊ लागली असून ग्रामीण भागात अशा अविवाहीत तरुणांच्या आत्महत्येच्या घटना वाढल्या आहेत. आणि ज्यांची लग्नं होतात, त्या लग्नातल्या अनावश्यक खर्चाची तर चर्चा न केलेलीच बरी.

समाजातील इतर कोणत्याही जातीपेक्षा मराठा समाजात व्यसनाधीनता अधिक आहे. गुटखा चघळणाऱ्यांची संख्या गावात किती, हे गावाबाहेरच्या टपरीच्या आजूबाजूला पडलेल्या रिकाम्या पुड्यांच्या खचावरून लक्षात येतं. शेती गुंतवून ठेवत नाही, योग्य वेळी लग्न होत नाही, त्यामुळेच गुटख्याच्या, दारूच्या व्यसनांनी तरुण पिढीला घेरलं आहे.

संघटित शेती ही एक आशा

बदलत्या परिस्थितीत शेती करणाऱ्या प्रत्येकाने वेगवेगळे प्रयोग करण्यापेक्षा एकत्र येऊन शेती करणं आवश्यक आहे. मराठा समाज हाच शेती व्यवसायात अग्रणी असला, तरी सध्या ज्या पीक पद्धती विकसित होत आहेत, त्यात या समाजातील तरुणांची संख्या कमीच आहे. तुकड्यातुकड्यात विखुरलेल्या शेतीतून आता प्रगतीची अपेक्षा ठेवता येणार नाही. मात्र राजकीय हस्तक्षेप न होता गटाच्या माध्यमातून तरुण शेतकरी एकत्र आले, तर ते संघटित शेती करू शकतात. त्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्रातच दिसून येतात. नाशिक येथील सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीसारखे उदाहरण आपल्याला सांगता येईल.

नव्या पद्धतीच्या गटशेतीत राजकीय हस्तक्षेप नसावा, अन्यथा त्याचं रूपांतर पुन्हा सहकारासारखं होऊ शकेल. त्यामुळे शेती करणाऱ्या मराठा तरुणांनी गटाने एकत्र येऊन शेती केल्यास आज शेती क्षेत्रात पसरलेलं नैराश्य दूर होऊ शकेल. शिवाय दोन एकरातही तुम्ही सुखाने जगू शकता हा सल्ला देणंही थांबवणं गरजेचं आहे. ५०० एकरचा शेतकरी अमेरिकेत अल्पभूधारक ठरतो, पण दोन एकर ते ५ एकर शेतीच्या भरवशावर मराठा समाजातील ८० टक्के लोकसंख्या शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असावी, हे समाजाच्या आर्थिक दुरवस्थेला कारणीभूत ठरत नाही का? शेतीच्या उत्पादनाची शाश्वती नाही, आलेल्या उत्पादनाला चांगला दर मिळेल याची खात्री नाही. सिंचनाची फारशी चांगली सोय नाही, नैसर्गिक संकटाच्या काळात आर्थिक संरक्षण नाही... अशा स्थितीत सगळ्यांनीच शेतीत अडकून पडावं का? याचा विचारही करायला हवा. यासाठी मूकमोर्चा एक माध्यम ठरला आहे.

आरक्षण टाळता येईल का?

आपण गावचे कारभारी या आविर्भावात वावरणाऱ्या मराठा पुढाऱ्याचं नि शेतकऱ्यांची प्रतिष्ठा जपता जपता दिवाळं वाजलंच आहे. राजकीय लाभ गावामुळे मिळतो म्हणून त्याची उडी गावाबाहेर कधी गेलीच नाही. शाळा किंवा सहकारातल्या संस्था, बँका नि कारखान्यांमध्ये नोकरी मिळावी इतपतच अनेकांचं शिक्षण, (फारच थोडे डॉक्टर, इंजीनियनर नि स्पर्धा परीक्षांत पुढे गेले) अर्थात ज्यांनी उच्च शिक्षण घेतलं, त्यांना सरकारी नोकरीत सामान्य मराठा तरुणाला संधी नाही हा अनुभव आला. आपली लायकी असूनही आरक्षणामुळे आपण डावलले जात आहोत ही भावना नव्या पिढीच्या मनात घर करू लागली. आपल्यालाही आरक्षण मिळावं ही भावना नव्या पिढीत निर्माण होण्यास या गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत. त्यामुळेच या मोर्चांच्या माध्यमातून आरक्षणाची मागणी प्रभावी पद्धतीने मांडण्यात आली आहे. महाराष्ट्रभर निघालेल्या या मोर्चांनी समाजमन ढवळून निघालेलं असल्याने आणि तरुणांच्या मनावर आरक्षणाशिवाय पर्याय नाही हे बिंबलं गेलं असल्याने समाजमनाचा रेटा पाहता आरक्षणाच्या बाजूने शासन, न्यायव्यवस्था सगळ्यांनाच विचार करावा लागेल, असं दिसतं.

सरकारने काय करावं?

सध्याच्या सरकारला मराठा समाजासाठी प्रामुख्याने दोन गोष्टी कराव्या लागतील. पहिली गोष्ट म्हणजे या समाजाला आरक्षण देता यावं यासाठी प्रयत्न करावे लागतील व दुसरी गोष्ट म्हणजे शेतीवर अवलंबून असलेल्या मराठा समाजातल्या शेतकऱ्याला पुन्हा प्रतिष्ठा कशी मिळेल यासाठी उपाययोजना कराव्या लागतील. शेतीसंबंधित उपाययोजनांमध्ये जिथे जे पिकतं त्या उत्पादनाला योग्य दर मिळणं, पुरेसं भांडवल उपलब्ध करून देणं, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करणं, शेतकऱ्याला कोणती पिकं परवडतात? कोणती पिकं लावावीशी वाटतात? त्याला शेतीत काय सुधारणा कराव्याशा वाटतात? शेतीत नव्या तंत्राच्या वापरासाठी काढलेलं कर्ज फिटू शकतं का? हा अभ्यास करणं गरजेचं आहे.

भविष्यातील वाटचाल

मोर्चानंतर पुढे काय? हा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जाईल. मराठा समाजाला संघटित करताना दुसरा जातीविषयी दुर्भावना असू नये. त्यामुळे सामाजिक सद्भावनेचा बळी जाऊ शकतो. गावोगावी मोठ्या संख्येने असलेल्या मराठा समाजाकडे 'कारभारी' या नजरेने पाहिलं जातं. हे कारभार जपताना तरुणाईला विधायक मार्गाला लावण्याची जबाबदारी समाजातील ज्येष्ठांची आहे. जळगावातील डॉ. राजेश पाटील यांच्यासारख्यांनी सुरू केलेल्या 'मराठा मंगल' सारख्या विधायक कामाची समाजात गरज आहे. शिवाजी ब्रिगेडच्या माध्यमातून अशोक शिंदे यांनी केलेल्या विधायक कामांचा आदर्श तरुणाईसमोर ठेवला जावा. निःस्वार्थी भावनेने राजाकरण करता येऊ शकतं. हे मराठा विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी दाखवून दिलं आहे. शेतकऱ्यांना नवनवीन माहिती उपलब्ध व्हावी, या हेतूने शैलेंद्र चव्हाण (संपादक, कृषी मासिक ॲग्रोवर्ल्ड)विविध जिल्ह्यांत शेतकऱ्यांसाठी ॲग्रोवर्ल्ड कृषी प्रदर्शन आयोजित करतात. अशी माणसं मोठ्या संख्येने महाराष्ट्रभर सापडतील. नैराश्याने वेढलेल्या मराठा समाजातील शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी विविध प्रकारच्या विधायक उपक्रमांची गरज आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

- श्री. ना. भ. आदमणे

इतिहास म्हणजे काय : इति-हा-अस म्हणजे याप्रमाणे घडले, म्हणून इतिहास अशी ही संकल्पना आहे. साधारणपणे सोळा-सतराव्या शतकापर्यंत इतिहास म्हणजे फक्त राजे, राजवाडे त्यांची राज्ये, त्यांच्यातील युद्धे इत्यादींची माहिती अशी गैरसमजूत होती. त्यामुळे तत्कालीन इतिहास त्याप्रमाणे नोंदला गेला. पुढे सतराव्या शतकांमधील वैचारिक क्रांतीमुळे संपूर्ण मानवी समाजाचाच, सर्व अंगोपांगाचा, घटनांचा इ. विचार करून लिहिलेला तो इतिहास असे मानण्यात येऊ लागले. इतिहासातील त्या दृष्टीने जी अनेक महत्त्वाची अंगे (पॅरामीटर्स), प्रमाणे आहेत, त्यामध्ये काल, स्थल (भूगोल) यांचा उल्लेख अटळ असावयास पाहिजे.

भारतीयांनी रामायण, महाभारत इत्यादी घटनांमध्ये या प्रमाणांना कमी महत्त्व दिले होते असे सर्वसाधारणपणे वरील दोन ऐतिहासिक घटना व त्यानंतर कित्येक शतकांपर्यंतचा विचार केला तर आढळते. इतिहासाच्या नवीन संकल्पनेचा उपयोग / वापर भारतामध्ये प्रथमतः काश्मीरमधील राजाच्या 'कल्हण' नावाच्या प्रधानाने इ.स.च्या बाराव्या शतकामध्ये केला.

या शिवाय भारतावर मुस्लीम व ब्रिटिश, फ्रेंच, पोर्तुगीज, स्पॅनिश इत्यादी युरोप व पश्चिम आशियामधील समाजाने जी आक्रमणे मध्य युगामध्ये केली व ते जेते झाले त्यांनी जो इतिहास लिहिला तो अर्थातच एकांगी व त्यांच्या दृष्टिकोनातून (biased mind) लिहिलेला होता. उदा. मुस्लीम (मोगल) राज्यकर्त्यांच्या इतिहासकारांनी छ. शिवाजी महाराज हे बंडखोर व पळपुटे (गनिमी) होते असे उल्लेख केलेले आहेत. दुसऱ्या महायुद्धापर्यंत ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल हे 'भारतीय हे मागासलेले असून नानावर्ण-भेद इत्यादींनी हे काळे लोक ग्रस्त असून त्यांची राज्य करण्याची लायकी (पात्रता) नाही' असे म्हणत होते हे प्रसिद्धच आहे.

या पार्श्वभूमीवर १९ व्या शतकापासून इतिहास हा त्या त्या समाजातील विचक्षण लोकांनी व विश्लेषणात्मक लिहावा हा विचार पुढे आला. मधील काळात अनेक गोष्टी व घटना घडून पुणे येथे दि. ७ जुलै सन १९१० 'भारत इतिहास संशोधक मंडळाची' स्थापना इतिहासाचार्य वि.का.राजवाडे व सरदार खंडेराव मेहेंदळे यांनी केली. मंडळाचा शत-सांवत्सरीक उत्सव सन १९०९ /२०१० मध्ये साजरा झाला. हे सर्व अत्यंत थोडक्यात (विस्तारभयास्तव) लिहिले आहे. पण जिज्ञासूंनी खुद्द इतिहास मंडळात वारंवार जावे व अधिक माहिती घ्यावी, केवळ प्रेरणा (Inspiration) उत्पन्न व्हावी हा या लेखाचा हेतू आहे असे लेखकाचे म्हणणे आहे. संस्थेतील साहित्य-सामग्री -कार्य

इ. ची माहिती पुढे थोडक्यात दिली आहे. मंडळाची बाजूची दगडी तीन मजली इमारत मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर साधारण १९६०-६२ मध्ये सरकारी खर्चाने मंडळास बांधून दिली असे स्मरते.

ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह / दफ्तरशाला -

भारताच्याच नव्हे तर जगांतील कोठल्याही इतिहासाच्या साधन-सामग्रीचे महत्त्वाचे अंग म्हणजे पत्रव्यवहार, बखरी, कैफियती, आज्ञापत्रे, हुकूमनामे, जुनी हस्तलिखिते, साहित्यकृती, चित्रे, शिल्पे, मूर्ती, नाणी, शिलालेख, पुरातत्त्वीय उत्खनने होत.

भारतामध्ये जेवढी खासगी संग्रहालये (अशासकीय) आहेत, त्यामध्ये भा.इ.सं.मंडळाचा क्रमांक बहुधा या संदर्भात पहिलाच असेल. मंडळाच्या दफ्तरखाना, पोथीशाळा या विभागात सुमारे सोळा लक्ष (फक्त!) मूळ कागदपत्रे असावीत असा स्थूल अंदाज आहे. ही कागदपत्रे फार्सी, मराठी, कानडी इत्यादी भाषांतील व मोडी, कानडी, अरेबिक इ. लिपीमधील आहेत. ज्या इतिहास संशोधकांनी ही कागदपत्रे जमविली त्यामध्ये वि.का.राजवाडे, सरदार मेहेंदळे, म.म.दत्तो वामन पोतदार, आबासाहेब मुजुमदार, स.गो.जोशी, ग.ह.खरे, रा.वि.ओतूरकर, दत्तोपंत आपटे, कृ.वा.पुरंदरे, वा.कृ.भावे, न.चिं.केळकर, य.न.केळकर, ना.गो.चापेकर, आवळसकर, चांदोरकर इ. संशोधकांचा समावेश आहे. ही कागदपत्रे जुन्नरी कागदार, काळ्याभोर शाईने लिहिलेली असून त्यांचे गठ्ठेच्या गठ्ठे

कापडी रुमालामध्ये बांधून व्यवस्थित ठेवलेले आहेत.

या कागदपत्रात छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज, इब्राहिम आदिलशाह, स्वामी चिदंबर दीक्षित, सेनापती बापू गोखले, नाना फडणवीस, शिंदे, होळकर, जाधव, बांदल, पेशव्यांचे दिल्लीतील वकील हिंगणे, घोरपडे, रामचंद्रपंत अमात्य इ. ची कागदपत्रे असून याचे ऐतिहासिक मूल्य अपार आहे.

मंडळातील पोथीशाळा

'भाइसं' मंडळाची पोथीशाळासुद्धा अत्यंत समृद्ध आहे. यातील बहुतेक पोथ्या संस्कृत, मराठी, फारसी इत्यादी भाषांमधील तत्कालीन कागदांवरील आहेत. ताडपत्रांवरील देखील पोथ्या असून त्या दक्षिणी लिपींमधील आहेत.

विश्वामधील सर्वात प्राचीन वाङ्मय म्हणजे वेद, संहिता, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, उपनिषदे इ. हे सर्व वेद वाङ्मय, शिवाय शिक्षा ग्रंथ, श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, शुल्बसूत्रे, निरुक्त, निघंटु, छंदःशास्त्र, ज्यातिष त्याचप्रमाणे आश्वलायन, बौधायन, हिरण्यकेशी, आपस्तंब इत्यादी शाखांची सूत्रे, मनुस्मृती, वसिष्ठस्मृती, अंगिरस स्मृती इत्यादी स्मृती वाङ्मय, अष्टाध्यायी सिद्धान्त कौमुदी, महाभाष्य असे व्याकरणशास्त्रावरील, तसेच ज्योतिषशास्त्रावरील अन्तर्दशाध्याय, अवकहडा चक्र ग्रंथ, वैद्यकीय शास्त्रवरील सुश्रुत, चरक, वाग्भट, शाङ्गधर, अजीर्णमंजरी, गर्भदोष चिकित्सा, आदी ग्रंथ स्थापत्य शास्त्रावरील कुण्डनिर्माण, विधी, गणितावरील लीलावती ग्रंथ, पुराणे, रामायण, महाभारत इ. आर्ष, महाकाव्ये त्याचप्रमाणे षड्दर्शने, अजपा गायत्री, बगलाकवच असे तांत्रिकोपयोगी ग्रंथ, तसेच शाकुंतल, अलंकार मंजरी, अनर्घराघव इ. काव्य, साहित्यावरील ग्रंथ, पंचतंत्र, किरातार्जुनीय, भारत चम्पू, गीतगोविंद, मेघदूत, देवतांची स्तोत्रे, सुभाषित संग्रहादि ग्रंथ, श्रीज्ञानेश्वरी, पांडवप्रताप, गाथासप्तशती, संतांचे अभंग इ. ग्रंथांची हस्तलिखिते पोथी शाळेत आहेत. या सर्व पोथ्यांचे डिजिटलयझेशनाचे काम सुरु असून ते या वर्षात पूर्ण होईल. ही सर्व हसतलिखिते सुस्थितीमध्ये आहेत.

इतर दुर्मिळ ग्रंथ व वृत्तपत्रे इ.

मंडळातील सर्वात जुने पुस्तक लंडनमधून इ.स. १६८७ मध्ये छापून प्रकाशित झालेले पुस्तक (मूळ फ्रेंच भाषेतील व त्यांचे इंग्रजी भाषांतर) 'दी ट्रॅव्हल्स ऑफ मत्स्य द तेवनो इन टू द लिव्हन्ट' या नावाचे आहे. या ग्रंथाचा लेखक भारतामध्ये येऊन गेला व त्याने या पुस्तकात गुजराथ, सिंध, बंगाल, माळवा इत्यादी ठिकाणांच्या भेटींचा व तत्कालीन स्थितीचा उल्लेख केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवर या पुस्तकांत एक स्वतंत्र प्रकरणच आहे.

या शिवाय जॉन एव्हिंग्टन याचे सन १६९६ मधील 'ए व्हॉयेज टू सुरत इन द इयर' १६८९ हे पुस्तक, एडवर्ड टेरी या पाद्री गृहस्थाने लिहिलेले 'ए व्हॉयेज टू इस्ट इंडिया' हा मूळ सन १६५५ मधील ग्रंथ, तसेच सन १८२० मधील 'सायक्लोपिडीया - युनिव्हर्सल डिक्शनरी ऑफ आर्टस, सायन्स अॅण्ड लिटरेचर' हा ग्रंथ, ग्रँट डफ याने लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचे सन १८२९ मध्ये केलेले मराठी भाषांतर, या शिवाय एलफिन्स्टन, मेजर क्यांडी, जॉन स्टुअर्ट मिल, लोकमान्य टिळकांचे वडील गंगाधर रामचंद्र टिळक यांचे 'लघुव्याकरण' हे सन १८६१ मधील पुस्तक, सन १८४२ मधील 'ज्ञानसिंधू' हे साप्ताहिक, 'ज्ञानप्रकाश' या दैनिकाचे १९ व्या शतकाचे अखेरीचे व २० व्या शतकाचे सुरुवातीचे अंक, तसेच 'केसरी' च्या अंकाचे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील अंक - अजून किती किती लिहू तरी कमीच असे अनेक महत्त्वाची वृत्तपत्रांचे, मासिकांचे अंक येथे आहेत.

ग्रंथालयातील कोश वाङ्मय

येथील ग्रंथालयामध्ये सुमारे ३० हजार ग्रंथ आहेत. मराठी प्रमाणेच इंग्रजी, फारसी, मोडी लिपीमधील साहित्यही भरपूर आहे.

या शिवाय महत्त्वाचे म्हणजे येथील ग्रंथालयात समृद्ध असे कोश वाङ्मयाचे अनेक ग्रंथ आहेत. की ज्याचा आपणास अंदाजदेखील येणार नाही. येथे एकूण चारशे-साडेचारशे कोश ग्रंथ आहेत. त्यामध्ये १९ व्या शतकांतील दुर्मिळ असे कोश आहेत. हे कोश वाङ्मय मराठी, संस्कृत, इंग्रजी, इतर भारतीय व परदेशी भाषांमध्ये आहे. येथील सर्वात जुना कोश म्हणजे 'डिक्शनरी ऑफ पर्शियन अरेबिक अॅण्ड इंग्लिश' हा ग्रंथ होय. याचा कर्ता जॉन रिचर्डसन असून हा सन १७७७ मधील आहे. या शिवाय हंसकोश (१८६३), धातूरूपकोश (१८७७), नामलिंगानुशासन कोश (१८९७), वैद्यक शब्दसिंधू (१८९४), स्थलनामकोश (१८९६) हे अत्यंत दुर्मिळ कोश आहेत. मोल्सवर्थ यांची मराठी - इंग्रजी डिक्शनरी, कन्नड-इंग्रजी डिक्शनरी (१८५८), बाबा पद्मजी यांची इंग्रजी-मराठी डिक्शनरी याशिवाय संस्कृत, फ्रेंच, ग्रीक, अरेबिक इत्यादी अत्यंत दुर्मिळ डिक्शनऱ्या आहेत. विसाव्या शतकातील चित्रावशास्त्रींचे चरित्रकोश, भारतीय मिथक कोश, संकेत कोश, ऐतिहासिक शब्दकोश, तत्त्वज्ञान महाकोश, आयुर्वेद - अर्थशास्त्र - कृषिशास्त्र, जीवशास्त्र यांचे परिभाषा कोश, मराठी भाषेचा तंजावरी कोश, जैन ज्ञानकोश, देवी कोश इत्यादी अनेक अनमोल कोश येथे आहेत.

मंडळातील इतर दुर्मिळ व संकीर्ण साहित्य इतर

क) कात्रणांचा संग्रह - मंडळामध्ये अत्यंत दुर्मिळ असा कात्रणांचा संग्रह असून त्यामध्ये अनेक ऐतिहासिक घटनांची, विषयांची, विविध चर्चासत्रांची अत्यंत मौल्यवान व साक्षेपी

अशी नोंद आहे.

ख) फारसी सहित्य - फारसी ही मध्य आशियातील एक आर्यभाषा आहे. मंडळामध्ये फारसी साहित्याचे मुख्यतः तीन प्रकार आहेत. लिपी, शब्दकोश, व्याकरण, ऐतिहासिक साधने ग्रंथ, इ. व काव्य, ज्योतिष इत्यादी.

ग) पुराभिलेख शास्त्र - मंडळामध्ये अनेक शिलालेख, ताम्रपट, इत्यादी कोरीव लेख आहेत. यात वाकाटक राणीप्रभावती गुप्ती, विजयादित्य चालुक्य, राष्ट्रकूट पहिला कृष्णराज, राष्ट्रकूट तिसरा गोविंद त्याचा ताम्रपट, कदंब मयूर शर्मन याचा ताम्रपट, शक ९८२ मधील आद्य मराठी भाषेतील दिवे आगर येथील ताम्रपट इत्यादी आहेत.

घ) या शिवाय वीर गळ, शिलालेख इत्यादी वस्तू.

च) भाई संशोधक मंडळाने पुरातत्त्वीय उत्खननेसुद्धा केली आहेत. उदाहरणार्थ, कऱ्हाड येथील पंतांचा कोट येथील उत्खनन सन १९४८ मध्ये केले. यावेळी श्री. ग.ह.खरे यांचे समवेत री. सांकलिया व श्री मो.गं.दीक्षित सुद्धा होते. त्यानंतर मंडळाने सन १९८४-८५ मध्ये श्री. म.श्री.माटे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्खनन केले.

छ) मंडळामध्ये कै. श्री.ग.ह.खरे यांचे नावाने एक वस्तुसंग्रहालय तयार करण्यात आले आहे.

ज) मंडळाने एक चित्रशाळा तयार केली असून त्यात अकबर, बिरबल, इब्राहिम आदिलहशा, पहिले बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, माधवराव पेशवे आदींची चित्रे, तसेच बारमासा चित्रे, राजस्थान शैलीतील चित्रे, मराठा आरमाराची चित्रे इ. आहेत.

नकाशे

आपणास विदीतच आहे की इतिहास व भूगोल यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. स्वतः औरंगजेबाने मराठ्यांच्या प्रदेशाची एक मेणाची प्रतिकृती व ती सुद्धा प्रमाणभूत बनवून घेतली होती. या मंडळातील नकाशे बहुतकरून इंग्रजी इमदानीमधील आहेत. येथील नकाशांची वर्गवारी साधारण खालीलप्रमाणे करता येईल.

१. इंग्रज काळातील १९ व्या शतकातील नकाशे २. मुंबई इलाख्याचे नकाशे यात सन १९०० पूर्वीचे व नंतरचे नकाशे ३. भूपृष्ठाचे नकाशे (Topo Sheets) ४. पेशवाईमधील किल्ल्यांचे नकाशे ५. संकीर्ण नकाशे - यात ॲटलास, खंड, महासागर, देश इ. नकाशांचा समावेश आहे.

मंडळामधील नाणी

इतिहास लेखनाच्या कार्यात नाण्यांचे अपार महत्त्व आहे. याने प्राचीन इतिहासातील अनेक कच्चे दुवे जिगसॉ पझलप्रमाणे जोडता येतात. यावर लिहिण्यासारखे खूपच आहे पण त्यापूर्वी एक बोलकी हकिकत सांगावीशी वाटते.

भारताच्या इतिहासातील महाभारत काळ ते पुढील 'नंद' घराण्याचा काळ फारसा ज्ञात नाही. अलेक्झांडरच्या इ.स. पूर्व ३२७ मधील स्वारीनंतर तो वायव्य सरहद्द प्रांतांमधूनच ग्रीसला परत गेला. जाण्यापूर्वी त्याने येथे चार ग्रीक गव्हर्नर्स नेमले होते. ह्यांनी ग्रीक भाषेतील व भारतीय ब्राह्मी लिपीतील अशी द्वैभाषिक नाणी पाडली होती. दरम्यान सम्राट अशोक (मौर्य) याचे राज्य सुरू झाले. त्याने त्याच्या साम्राज्यात ठिकठिकाणी स्तंभ (अशोक) उभारले होते व त्यावर काही मजकूर लिहिला. पुढे मोगल सम्राट अकबर याने त्याच्या दरबारात अनेक हिंदू विद्वान पंडितांना बोलावून त्यावर काय लिहिले आहे ते वाचण्यास सांगितले. परंतु एकाही पंडिताला ते शिलालेख वाचता आले नाहीत. पुढे ब्रिटिश काळामध्ये सन १८४० च्या सुमारास कलकत्ता येथील टांकसाळी मध्ये 'जेम्स प्रिन्सेप' नावाचा एक अधिकारी आला. त्याला नाणी संग्रहाची आवड होती. त्याने अनेक हजारो नाणी गोळा केली. पैकी वायव्य सरहद्द प्रांतातील नाण्यांवर ग्रीक मुद्रा व मजकूर होती. तो त्याने वाचला परंतु दुसऱ्या भाषेत काय लिहिले आहे हे कळेना. त्याना अत्यंत अभ्यासपूर्वक तो मजकूर व ग्रीक मजकूर जमवला. ती दुसरी अक्षरे ब्राह्मी लिपीतील होती. ते सर्व 'वर्णक्रम' त्याने बरोबर जोडले व सर्व ब्राह्मी लिपी ता वाचू शकला. अशोक स्तंभावरील मजकूर 'देवांना प्रिय' इत्यादी मग त्याने बरोबर जुळवला. तोपर्यंत तो एतद्देशीय भारतीयांनासुद्धा वाचता आला नव्हता. त्यानंतर तो आपणास आता ज्ञात आहे. असो

इतिहास मंडळाने सन १९१७ पासून नाण्यांचा संग्रह करण्यास सुरुवात केली. सुरुवातीस श्री. वा सी. बेन्द्रे यांनी अत्यंत उत्साहाने हे काम केले. त्याचे नंतर चांदोरकर, ग.ह.खरे, रा.ह.गाडगीळ, सरदार मुजुमदार इत्यादीनी नाणी संग्रहास मोठी चालना दिली. यात सिंहाचा वाटा श्री. ग.ह.खरे यांचा होता. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सन १९३३ मध्ये या नाण्यांची यादी करून त्याचे वर्गीकरण केले व एक कॅटलॉग व 'मंडळाची नाणी' नावाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला.

मोगलाईमध्ये व पेशवेकाळातसुद्धा किरकोळी (खुर्द) नाणी पाडण्याचा अधिकार व टांकसाळी काही मक्तेदारांना दिला होता. शिवकालातल 'शिवराई' ते तांब्याचे नाणे प्रसिद्ध आहे. मंडळाच्या संग्रहात मोगल, मराठी, चिनी, अरबी, ग्रीक, पर्शियन आदी काळातील शेकडो नाणी आहेत.

तणावमुक्त दिनचर्या

- वैद्य प्रिया नाईक
एम. डी. (आयु.)

काळ बदलला तसे राहणीमान बदलले. आवडीनिवडी, गरजा बदलल्या. नवनवीन तंत्रज्ञानाची जोड मिळत गेली करमणुकीची साधने आली. अर्थातच, बदल हा नेहमीच अपरिहार्य आणि स्वागतार्हच असतो. त्याशिवाय प्रगती होत नाही. त्यामुळे या विकसित झालेल्या साधनांना विरोध करणे योग्य नाही. पण या सुखसुविधांचा वापर आपल्या दैनंदिन व्यवहारात किती असावा. याचा विचार मात्र करायला हवा नक्कीच!

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला, उठी लवकरी वनमाळी....वनमाळी... दिवसाची सुरुवात याहून सुमधुर कशी असेल?

प्राजक्ताचा बहर अंगणी
सडा- सारवण मंजूळ गाणी
वासुदेवाचा गजर कानी
दिनकराच्या स्वागताची कहाणी !!

पूर्वीची पहाट डोळ्यांसमोर उभी राहिली. ते पावित्र्य ती शांतता मनाला भुरळच घालते अर्थातच त्यावेळी आयुष्यामध्ये hurry,worry,curry ने शिरकाव केला नव्हता. तेला-उटण्यानं आंघोळ, भरपेट आणि सकस न्याहरी या सगळ्याने दिवसाची दमदार सुरुवात होत असे. तेलाचा मुबलक वापर होत असे, आहारात नव्हे तर शरीरावर, कानात, नाकात, त्वचेवर डोक्यावर , तळपायाला!!! दातांच्या स्वच्छतेसाठी कोणत्याही ब्रँडच्या टूथपेस्ट किंवा ब्रशची गरज नव्हती, तर नैसर्गिरीत्या उपलब्ध नीम-खदिराच्या काड्या, घरगुती दूध-दही- तुपाचा सढळ वापर नाही, नाही, calories ची चिंता अजिबात न करता पण तरीही lifestyle disordered झाली नव्हती, कारण या सगळ्याचा तोल व्यायाम आणि कष्टाचे काम याद्वारे सांभाळला जात होता. झोपेचं चक्र सुरळीत चालत होते. तुलनेने मानसिक तणावाचे प्रमाण कमी होते. शेजाऱ्यांची मित्र-मंडळी-परिवाराची चौकशी करायला वेळ होता. वैचारिक देवाणघेवाण होत असे. मोबाईल व्हॉटस्-ॲप, फेसबुक, संगणकाची रेलचेल नव्हती. त्यामुळे लोक फेसबुकवर नाही तर फेस-टू-फेस भेटत होते.

काळ बदलला तसे राहणीमान बदलले. आवडीनिवडी, गरजा बदलल्या. नवनवीन तंत्रज्ञानाची जोड मिळत गेली करमणुकीची साधने आली. अर्थातच, बदल हा नेहमीच अपरिहार्य आणि स्वागतार्हच असतो. त्याशिवाय प्रगती होत नाही. त्यामुळे या विकसित झालेल्या साधनांना विरोध करणे योग्य नाही. पण या सुखसुविधांचा वापर आपल्या दैनंदिन व्यवहारात किती असावा. याचा विचार मात्र करायला हवा नक्कीच! तंत्रज्ञान आपल्यासाठी की आपण तंत्रज्ञानासाठी? सध्याची आपली अवस्था आहे. टिकटिक वाजते डोक्यात. धडधड वाढते ठोक्यात. खरोखरच घड्याळ्याच्या काट्यावर आपल्या जीवनशैलीची गणिते आपण बसवली आहेत. या धावपळीत मात्र शरीराला गृहीत धरणे हे चुकीचे आहे.

'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनाम् । धर्मपालन करण्याचे प्रमुख साधन म्हणजे शरीर. त्या धर्मसाधनाची यथायोग्य काळजी ही घेतलीच पाहिजे, कशी? उत्तरे तुमच्या - आपल्या आयुर्वेदामध्ये आधीच लिहून ठेवली आहेत.

प्रसंग १) - सागर वय वर्ष २५. कॉल सेंटरमध्ये काम. बहुतेक वेळा रात्रपाळी. जागे राहण्यासाठी चहा-कॉफीचा मारा. सकाळी घरी येऊन झोप घेणे. दुपारी उठून जेवण. पुन्हा झोप संध्याकाळपर्यंत. परिणामी बद्धकोष्ठता, अपचन, डोकेदुखी शत्रू गोळा व्हायला लागले.

काय करावे सागराने? नोकरी सोडवी? आणि शक्य नसेल तर?

सृष्टीच्या नियमानुसार रात्र आणि दिवस हे अहोरात्रीचे भाग आहेत. सृष्टीमध्ये रात्री सर्व नित्यक्रम मंदावतात. पान,फुले मावळतात, पशुपक्षी शांत होतात, तमाचा (अंधार) प्रभाव वाढतो यथा पिण्डे तथा ब्रह्माण्डे. शरीरामधील सर्व वहन-चलन-वलन रात्री मंदावते.



चयापचयाचा वेग मंदावतो आणि श्रान्त शरीराला विश्रांती घेण्याची वेळ होते. लहानपणी आपल्या चिमुकल्या बुद्धीवर बिंबवले गेले आहे - लवकर निजे, लवकर उठे इ. शाळेत गेल्यावर Early bird catches the worm इ. सुविचार. मग लवकर म्हणजे कधी? तर ब्राह्म मुहूर्तावर! म्हणजेच सूर्योदयापूर्वी १ ते १/२ तास. का उठावे? ब्रह्म म्हणजे ज्ञान. ज्ञानसाधनेसाठी योग्य काळ म्हणजे ब्राह्ममुहूर्त. याला अध्ययन काळ असे देखील म्हणतात. वातावरण जसे ताजेतवाने असते, तसेच आपला मेंदूसुद्धा तल्लख असतो. या वेळेत केलेले पाठांतर चांगले लक्षात राहते. आधुनिक वैद्यकाने केलेल्या अभ्यासानुसार या काळात स्त्रवणारे हॉर्मोन्स आणि न्यूरोकेमिकल्स हे रोगप्रतिकारशक्ती, स्मरणशक्ती वाढविणारे आणि चिडचिडेपणा कमी करण्यास मदत करतात. आपल्या शरीरातील plasma cortisol hormone हा मानसिक ताण - तणाव सहन करण्यास मदत करतो. या हॉर्मोन्सचे प्रमाण ACTH हा हॉर्मोन्सवर अवलंबून असते आणि ACTH ची निर्मिती सकाळी अधिक प्रमाणात होते. म्हणजेच या काळात उठल्याने आपल्या शरीरात सकारात्मक ऊर्जा तयार होते.

सकाळी लवकर उठल्याने वाताच्या अनुलोमन कार्याला मदत होऊन पोट व्यवस्थित साफ होते. पण जर रात्रीचा आहार पचला नसेल तर मात्र थोडे झोपून आहार पचल्याची खात्री झाल्यावरच उठावे. अशक्त व्यक्ती, रुग्ण यांना देखील शास्त्राने या ब्राह्ममुहूर्तातून थोडी सूट दिली आहे. अपरिहार्य कारणांमुळे जे रात्री उशिरा झोपतात. त्यांनी झोप पूर्ण करून मगच उठावे. पण शक्यतो सूर्योदयानंतर झोपू नये.

आता अशा परिस्थितीत सागरने काय करावे? जेवणानंतर झोपण्यापेक्षा जेवणाआधी झोप घ्यावी. या काळात चहा-कॉफी घेऊ नये. उजेड आत न येऊ देता, अंधार करून झोपावे. कारण अंधार असेल तेव्हा मेंदूकडून Melatonin या झोप आणणाऱ्या हॉर्मोनची निर्मिती होते. तसेच रात्रपाळीच्या आधी झोप पूर्ण करावी. रात्रीचे चहाचे प्रमाण कमी करावे.

तळपायाला तेल चोळावे. शक्य तेव्हा सर्वांगाला तेल लावावे. जागरणामुळे शरीरातील वात वाढतो. परिणामी त्वचेवर कोरडेपणा, वजन कमी होते, मलबद्धता, अपचन अशक्तपणा, डोळ्यांची जळजळ अशी लक्षणे दिसू लागतात. हल्ली तेला-तुपाबद्दल फारसा स्नेह health conscious व्यक्तींमध्ये दिसून येत नाही, पण सागरने आहारात तुपाचा समावेश जरूर करावा.

प्रसंग २ - मनाली, वय वर्षे २०, कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्षाला आहे. उत्साही, वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये भाग घेणारी. बरेच दिवसांपासून दातांच्या काही न काही तक्रारी चालू होत्या. कधी दात-दुखी, हिरड्यांतून रक्त, कधी पू येणे, हिरड्यांना सूज, थंड किंवा गरम खाताना / पिताना दातांतून कळ येणे, तोंडाला दुर्गंधी अशा तक्रारींनी ग्रासली होती. मुखदुर्गंधीमुळे हळूहळू आत्मविश्वास कमी होत होता. दंतवैद्याला दाखविले. त्याने योग्य ते उपचार केले. पण या तक्रारी पुन्हा उद्भवू नये किंवा मुळात उत्पन्नच होऊ नये म्हणून मनालीने काय करायला हवे?

अरे घाबरू नका, मी तुम्हाला अजिबात विचारणार नाही.क्या तुम्हारे टूथपेस्ट मे नमक है? कारण मुळात टुथपेस्टमध्ये नमक नकोच. टूथपेस्ट नेहमी कडू, तिखट किंवा तुरट चवीची असावी. पूर्वी नीम-खदिर यांच्या काड्या दातौन म्हणून वापरली जात असत. हे करत असताना कडुनिंबासारख्या औषधींचा रस जर पोटात गेला, तर जंतदेखील होणार नाहीत. खात्रीशीर ठिकाणहून जर या काड्या मिळाल्या. तर त्यांचा वापर अवश्य करावा. यामुळे रात्रभर तोंडात तयार झालेला कफाचा चिकटा कमी होतो. मुखशुद्धी होते.

त्यानंतर व्यवहारात ज्याला आपण गुळण्या करणे म्हणतो, ते कवल किंवा गंडूष. कवल करण्यासाठी गरम पाणी, दूध, तेल, मधपाणी यांचा वापर करता येतो. कवल / गंडूष केल्याने ओठ फुटत नाहीत. तोंडाला कोरड पडत नाही तसेच दातांचे आरोग्य उत्तम राहते. मुखवैरस्य (चव न कळणे), मुखदुर्गंधी, वारंवार लाळ गळणे, हिरड्यांचे विकार नष्ट होतात. दात हलत असल्यास किंवा दातांमधून कळ येत असल्यास तिळ तेलाने कवल किंवा गंडूष करावे. तोंड येण्याची वारंवार तक्रार असल्यास दूध/ मधपाणी किंवा त्रिफळा काढ्याने गुळण्या कराव्या. सुका खोकला किंवा आवाज बसला असेल तर गरम पाणी, हळद व मिठाच्या गुळण्या कराव्यात.

कवळ म्हणजे कोणतेही द्रव्य (liquid) तोंडात धरून ते तोंडामध्ये सगळीकडे फिरवून टाकून देणे. तर गंडूष म्हणजे तोंडामध्ये द्रव्य इतक्या प्रमाणात घ्यावे की ते तोंडात फिरणार नाही (म्हणजे कवलपेक्षा जास्त) थोडा वेळ तोंडात धरून टाकून द्यावे. यामुळे चेहऱ्याच्या मांसपेशींना बळ मिळते. कांती सुधारते,चेहऱ्याच्या त्वचेवरील सुरकुत्या कमी होतात. आणि अर्थात दातांना बळकटी येते.

याचसोबत प्रतिसारण हा एक प्रकार मुख - आरोग्यासाठी सांगितला आहे जात्यादि तेल, शरिमेदादि तेल, लक्ष्यादि तेल या सारखी तेल हिरड्यांवर चोळून लावावीत. यामुळे दात घट्ट होतात, तसेच हिरड्यासुद्धा निरोगी राहतात.

प्रसंग ३ - मि. राजेश, वय वर्षे ३५ . बैठा व्यवसाय, सतत संगणकावर काम, ऑफिसमध्ये AC, कामाचा अतिरिक्त ताण असल्याने संगणकासमोरून उठता येणेच शक्य नाही. परिणामी खांदे, मान, पाठदुखी सुरू झाली. हातांमध्ये मुंग्या येणे, कधी चक्कर येणे असा त्रास सुरू झाला. यामुळे कामावर लक्ष देणे कठीण होऊ लागले. वेदनाशामक गोळ्यांनी तात्पुरता आराम मिळत होता. आहे का मि. राजेशसाठी काही उत्तर आयुर्वेदामध्ये? नक्कीच !

आयुर्वेदामध्ये नस्य दररोज करण्यास सांगितले आहे. नस्य म्हणजे औषधी तेलाचे थेंब नाकात टाकणे. अणुतेलाचे २-२ थेंब सकाळी - रात्री दोन्ही नाकपुड्यांमध्ये टाकावेत. नस्यामुळे शिरोगाभातील सर्व स्त्रोतस (मार्ग) मोकळे होतात. खांदे, मान

इथल्या मांसपेशींना बळ मिळते. डोळे, कान, नाक या इंद्रियांची कामे व्यवस्थित होतात. केस गळणे, अकाली पांढरे होणे यामध्येसुद्धा नस्याचे उत्तम फायदे होतात. जुनाट सर्दीमध्ये तीक्ष्ण तेलाचे नस्य केल्याने 'सायनस' मध्ये साचलेला कफ बाहेर पडतो व डोकेदुखी, डोके जड होणे ही लक्षणे कमी होतात.

प्रसंग ४ - सावंत काकू , वय वर्षे ४५, विरार ते चर्चगेट रोजचा प्रवास कधी कधी गर्दीमध्ये उभे राहून पोटऱ्या, टाचा दुखू लागत. तळपायाला भेगा पडल्याने पायांची जळजळ होत असे आणि थकव्यामुळे झोप लागत नसे. परिणामी डोळ्यांची जळजळ, डोळ्याखाली काळी वर्तुळे दिसू लागली. झोप पूर्ण न झाल्याने चिडचिडेपणा पण काकूंना एका वैद्य मैत्रिणीने नामी उपाय सुचविला आणि त्यांचा त्रास बऱ्याच अंशी कमी झाला.

अभ्यंग - अभ्यंग म्हटल्यावर आपल्याला दिवाळी आठवते, हो ना? पण अभ्यंगाचा महिमा फक्त दिवाळीपर्यंत सीमित नाही हा!!

अभ्यंगो जरापहः । अभ्यंग वार्धक्य दूर ठेवतो म्हणजेच Antiaging!! आज आपण हजारो रुपयांची सौंदर्यप्रसाधने वापरतो. खरंच तितका उपयोग होतो का त्यांचा? आणि त्यात side-effects ची भीती! हा स्वस्त पण मस्त सौंदर्यवर्धक अभ्यंग वापरून पाहा... आणि तुमची मुलगी नक्की म्हणेल.... ममा, तू अगदी little girl दिसतेस.

अभ्यंग म्हणजे अंगावर तेल चोळणे. तेल वाताचे शमन करणारा आहे. वायूमुळे त्वचेवर आलेला कोरडेपणा, काळपटपणा, निस्तेजपणा अभ्यंगाने कमी होतो. औषधीसिद्ध सुगंधित तेलाने अभ्यंग करून स्नान केल्याने मनसुद्धा प्रफुल्लित आणि प्रसन्न होते. शरीराच्या मांसपेशींना बळकटी देतो. कांती सुधारते. त्वचा सतेज, तुकतुकीत होते. बेचैनी, थकवा दूर होतात.

आयुर्वेदानुसार जरी जरी संपूर्ण शरीराला रोज अभ्यंग शक्य नसेल तरी विशेषतः शिर (डोके) कान व पायाला अभ्यंग नित्यनेमाने करावा. विविध ब्युटीपार्लर्समध्ये Foot massage आणि Head massage करतात. अर्थातच भक्कम पैसे भरून! पण त्यापेक्षा दररोज आपण थोडा वेळ स्वतःसाठी काढून हा घरी केला तर!

डोक्याला तेल लावल्याने झोप शांत लागते. अमिताभ बच्चन यांनी सांगितले आहेच ना - टेन्शन जाईल पेन्शन द्यायला केसांची वाढ चांगली होते. कोंडा, चाई, केस गळणे, अकाली पिकणे, रुक्ष, निस्तेज होणे, केसांच्या टोकांना फाटे फुटणे (दोमुहे बाल) या समस्य उद्भवत नाही.

तळपायाला दररोज रात्री झोपताना तेल लावावे. झोप चांगली लागते. डोळ्यांची जळजळ कमी होते. तळपायांना भेगा पडत नाहीत. परिणामी तुमचे पायसुद्धा सुंदर दिसतात. कोरडेपणा कमी होतो. कधी तरी तेल लावून थोडा वेळ कोमट पाण्यात पाय बुडवून ठेवावेत. नंतर एखाद्या 'स्क्रबर' किंवा उटण्याच्या चूर्णाने घासावे मृतत्वचा निघून जाते. pedicure म्हणजे हेच ना?

माझी चार वर्षांची मुलगी कधी खूप खेळून दमली असेल आणि झोप येत नसेल, तर स्वतःहून सांगते - ममा, पायाला तेल लाव ना! आणि खरोखरच तेलाने तळपाय चोळून दिल्यावर ती शांत झोपते.

कानात तेल घालावे की नाही याबद्दल खूप वाद होत असतात. आधुनिक वैद्यक म्हणते की त्यामुळे कानात जंतूसंसर्ग (infection) होते. पण कानात तेल तापवून थंड करून घातल्यास कानामध्ये वायु वाढून जी लक्षणे दिसतात ती कमी होतात. कानात तेल घातल्याने मान, डोके, कान या ठिकाणच्या वेदना नष्ट होतात. परंतु अतिप्रमाणात सर्दी असल्यास, कानातून पू/पाणी येत असल्यास किंवा कानाच्या पडद्याला छिद्र असल्यास कानात तेल घालू नये तसेच ताप, अजीर्ण असताना अभ्यंगसुद्धा करू नये.

प्रसंग ५ - मकरंद, वय वर्षे ३३ बैठा व्यवसाय, त्यात खाद्यप्रेमी, रात्रीचे जेवण उशिरा, लगेचच झोप. वजनाचा काटा किलो-किलोनी प्रगती करू लागला. ३३ व्या वर्षीच bad cholesterol पाहुणा शरीरात ठिय्या मांडून बसला. कसली कमतरता होती बरं मकरंदच्या दिनक्रमात? व्यायाम Exercise पूर्वीच्या लोकांच्या उत्तम आणि दणकट तब्येतीचे रहस्य. नियमित व्यायाम केल्याने शरीर हलके होते. काम करण्याची शक्ती येते, संचित चरबी कमी होते. त्याचप्रमाणे पचनशक्तीसुद्धा वाढते. शरीर सुडौल आणि प्रसन्न हो. 'स्टॅमिना' वाढतो HDl किंवा good cholesterol वाढतो. आणि LDL (bad cholesterol) कमी होतो. श्वासोच्छ्वासाची गती वाढल्याने शरीराला प्राणवायू (oxygen) चा पुरवठा अधिक होतो. त्यामुळे व्यायाम नेहमी मोकळ्या हवेत करावा. घामासोबत शरीरातील काही विषाक्त घटकसुद्धा बाहेर पडतात. म्हणून वातानुकूलित वातावरणात व्यायाम करू नये.

व्यायाम किती करावा? दम लागला की बंद करावा. दमछाक होऊ देऊ नये. तसेच कोणत्याही अवयवात वेदना होत असतील, तर तो व्यायाम तिथेच थांबवावा. एखाद्या अवयवास दुखापत झाली असेल, तर तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.

शरीरातली चरबी कमी करण्यासाठी आयुर्वेदाने 'उद्वर्तन' सांगितले आहे. उद्वर्तन म्हणजे उटणे. उटण्यामुळे शरीराला विकृत झालेला कफ, चरबी कमी होते. मृतत्वचा निघून गेल्याने त्वचा मृदू कांतीमान होते. उद्वर्तन केल्यानंतर गरम (सुखोष्ण) पाण्याने स्नान अवश्य करावे, पण स्नान करताना डोक्यावर मात्र अति- गरम पाणी घेऊ नये. त्यामुळे केसाच्या आरोग्याला हानी पोहोचते. स्नानामुळे अर्थातच सौंदर्य वाढते, पाचनशक्ती वाढते, प्रसन्न वाटते.

वरील सर्व दिनचर्येतील उपक्रम जरी प्रसंगानुरूप वर्णन केले असले तरी देखील प्रत्येकाने हे उपक्रम थोडा वेळ काढून आपल्या दिनक्रमात अंतर्भूत करावे, जेणेकरून तुमचे आरोग्य उत्तम आणि परिपूर्ण राहील.

योगायोगाच्या निमित्ताने...

- प्रा. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी

दिनांक २१ जूनला देशव्यापी पातळीवर योगदिन साजरा करण्यात आला. योगाचे महत्त्व विशद करणारा लेख - संपादक

२१ जूनच्या दिवशी देशव्यापी पातळीवर उत्साहभरल्या वातावरणात साजऱ्या झालेल्या योगदिनाच्या निमित्ताने एकूणच सामाजिक आणि आरोग्य जाणिवांमध्ये कुठल्या प्रकारची भर पडणार आहे हे एका अर्थाने कोडेच म्हणावे लागेल. तरीही केंद्रस्तरावरून तसेच प्रशासकीय पातळीवरून अशा प्रकारचा एक सर्वव्यापी आणि अत्यंत वेगळा प्रयत्न होतो हे निश्चित.

भारतीय जनमानसाच्या दृष्टीने 'योगाचे' महत्त्व दोन प्रकारे सांगता येते. अत्यंत प्राचीन आणि गहन अशा भारतीय षड्दर्शनांमध्ये एक 'दर्शन' म्हणून योगाचे महत्त्व वादातीत आहे. न्याय-वैशेषिक आणि इतर दर्शनांच्या जोडीने योगदर्शनाचा विचार भारतीय तत्त्वज्ञानात केला जातो. निरिश्वरवादी, परंतु तरीही आस्तिक असणाऱ्या योगदर्शनाचे भारतीय तत्त्वज्ञानविचारात असलेले योगदान मोलाचे असून अनेक दार्शनिकांनी आणि तत्त्वज्ञानी या दर्शनाचा यथायोग्य परामर्श घेतलेला दिसून येतो. विश्वातील मूलकण 'जव-जगत् वाद' तसेच पृथ्वीवरील मानवी अस्तित्वाचे. चिंतन, 'आत्म' तत्त्वविषयी स्वतंत्र चिंतन या सर्व बाबी एक 'दर्शन' म्हणून 'योग' दर्शनाच्या अनुषंगाने विचारात घ्याव्या लागतात. याशिवाय अनुमान, प्रमाण आणि ज्ञानमीमांसेच्या क्षेत्रातही योगदर्शनाचे योगदान लक्षणीय आहे.

दुसरे म्हणजे, प्राचीन भारतीयांच्या आरोग्यविषयक जाणिवांची प्रागतिकतादेखील योगदर्शनाच्या माध्यमातून समजून घेता येऊ शकते. प्राणायाम, योगासने यांच्याच जोडीला आहारशास्त्र, शरीरनियमनशास्त्र यांचा विचारदेखील योग दर्शनाने केला असल्याचे दिसून येते.

अंतिम ध्येयाच्या प्राप्तीसाठी(मोक्ष) मानवी शरीराचे संयमन, नियमन व त्याच्या प्रमाणबद्ध, आरोग्यपूर्ण विकास या सर्व घटकांचा विचार योगदर्शनाने केलेला असून, या सर्व घटकांचे अनुकरण प्रत्यक्ष जीवनात कसे करता येईल यासंबंधीचे मार्गदर्शनदेखील योगदर्शन करते. म्हणूनच श्रीमद्भगवद्गीतेने देखील योगदर्शनाची यथोचित दखल घेतल्याचा पुरावा देता येतो. इतर दर्शने, बाह्य जग व मानवी शरीराचे वैय्यर्य अधोरेखित करत असताना योगशास्त्र व योगदर्शनाने मात्र मानवी शरीर व त्याचे मानवी जीवनातील वाटचालीच्या दृष्टीने असणारे दुर्दम्य महत्त्व वारंवार अधोरेखित केले आहे. याच कारणास्तव योगशास्त्र व त्यातील आहार-विहार पद्धतींचे अनुकरण भारतीय समाज हजारो वर्षांपासून करत आला आहे.

काळाच्या ओघात जीवनपद्धती बदलत गेली. मानवी आयुष्य अधिक वेगवान झाले आणि त्याबरोबरच प्राचीन योगविचाराने घालून दिलेली आहारविहाराची चौकट 'कालबाह्य' व 'अनुकरण्यास कठीण' म्हणून मोडीत निघाली. हा कदाचित पाश्चात्त्यीकरणाचा प्रभाव होता असेही म्हणता येईल. कालांतराने या वेगवान जीवनशैलीचे दुष्परिणाम मानवी जीवनावर व एकूणच समाजावर आघात करताना दिसू लागले. आरोग्यपूर्ण व निरामय जीवनासाठी काय करावे अशा प्रकारची संभ्रमावस्था समाजात निर्माण झाली आणि योगविचार काळाच्या ओघात मागे पडला. योगशास्त्राला पर्याय म्हणून इतर साधने पुढे आली आणि कालौघात विरलीसुद्धा. परंतु चिरंतन व शाश्वत असा योगविचार छोट्याशा पणतीप्रमाणे का होईना, पण आजही समाजजीवनाला दिग्दर्शन करतो आहे . भले, मागच्या काळातील योगशास्त्राचे 'योगा' (Yoga) असे इंग्रजीकरण झाले असेल. सामूहिकरीत्या लोकांना योगपद्धती शिकवावी लागत असेल किंवा योगशिक्षकांना त्याच्या प्रसारासाठी श्रम घ्यावे लागत असतील, तरीही योगशास्त्राच्या द्रष्टेपणामुळे व मुळातच भारतीय परंपरेने 'योगः कर्मसु कौशलम्' अशी व्याख्या मान्य केलेली असल्याने योगविचार हा जीवनशैलीपासून वा कार्यशैलीपासून विमुक्त करता येणे अशक्य आहे आणि यातच त्याचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.

आता थोडेसे २१ जूनच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निमित्ताने. थेट केंद्रपातळीवरून योगशास्त्रासारख्या पारंपरिक आणि प्राचीन भारतीय विचाराची जाहीर पाठराखण होण्याची ही कदाचित पहिलीच वेळ. त्यामुळेच कदाचित देशपातळीवर या उपक्रमाची वारेमाप चर्चा होताना दिसते. या उपक्रमातून नेमके काय साध्य होणार व याचा नेमका हेतू काय असून, कुठल्या औचित्याने हे घडवून आणले जात आहे याविषयी एकूणतःच औत्सुक्य व नावीन्य समाजात उमटताना दिसते आहे. या उपक्रमाचे दृश्य परिणाम २१ जून नंतर दिसतीलच. परंतु त्यासंबंधाने आज घडीला मात्र विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. प्रतिगामी विरुद्ध पुरोगामी, धर्मनिरपेक्ष विरुद्ध धर्मसमर्थक, हिंदुत्ववादी विरुद्ध अहिंदुत्ववादी, डावे विरुद्ध उजवे अशा सर्वच प्रकारच्या वैचारिक आघाड्या या वादात उतरल्या असून, प्रत्येक जण यासंबंधीचे वैचारिक मांडणी करताना दिसतो आहे. देशाच्या सर्वोच्चपदी विराजमान असणाऱ्या व्यक्तीकडून प्राचीन भारतीय विचारांचे, हिंदुत्ववादी विचारांचे पुनर्स्थापन करण्याचा हा जाहीर प्रयत्न आहे असा युक्तिवाद या प्रसंगाने केला जातो आहे. परंतु मुळात योगविचाराचा प्रसार व भगवीकरण, हिंदुत्वीकरण यांचा काय संबंध असाही प्रश्न उपस्थित करता येईल! पण ते असो.

भारत - एक विश्वशक्ती

- के.जनरल(डॉ.) दत्तात्रय शेकटकर

पाश्चात्त्य जगता (विशेषतः अमेरिका, ब्रिटेन, व सम्पन्न देश) मध्ये अचानक जाणीव झाली आहे की येणाऱ्या काळात २०३५ पर्यंत भारत एक मोठ्या, सक्षम शक्तीच्या रूपात जगात उभारणार आहे. ही जागरुकता पाश्चात्त्य जगतामध्ये व ही अनुभूति भारतात अचानक का उद्‌भवली? भारतीय राष्ट्रतंत्र, भारतीय राज्यतंत्र, शासनतंत्र, जनमासन, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात पण ही जाणीव आहे का? आपला देश एका मोठ्या शक्तिशाली शक्तीच्या रूपात उभारण्याची क्षमता ठेवतो ही जाणीव व ही इच्छा जोपर्यंत भारतीय सर्वसामान्य माणसाला होणार नाही तोपर्यंत भारत समर्थ व शक्तिशाली होणार नाही.

१. आपण सर्वसाधारणतः म्हणतो की, ''भारत समर्थ झाला पाहिजे'' आपल्याकडे 'समर्थ भारत व्यासपीठपण आहे.' एक फार आवश्यक व प्रशंसनीय उपक्रम व प्रयास आहे. परंतु आपण एक महत्त्वपूर्ण वास्तविकता लक्षात ठेवणे आवश्यक आहे. जोपर्यंत भारतीय सामान्य व्यक्ती, सामान्य नागरिक, ग्रामीण शेतकरी समर्थ होत नाही, जोपर्यंत प्रत्येक ग्राम समर्थ होत नाही. तोपर्यंत भारत समर्थ होणार कसा? दिल्ली, मुम्बई, कलकत्ता, मद्रास ही मोठी शहरे जरी सम्पन्न झाली तरी भारत समर्थ होणार कसा? कारण ९०% भारत तर ग्रामीण आहे. फक्त १०% भारत मोठ्या शहरात आहे. भारताला एक महाशक्ति तयार करण्याकरता, शासनतंत्र, राजतंत्र आणि सर्व राजनैतिक पक्षात दूरगामी दृष्टिकोन व दीर्घकालीन दृष्टिकोन व योजना आहे का? हे दिव्य स्वप्न साकार करण्याकरता आपण सर्वांनी काय केले पाहिजे ह्या महत्त्वपूर्ण प्रश्नावर आपण कधी विचार केला आहे का? ह्या लक्ष्यप्राप्तिकरता एक समयबद्ध योजना तयार केली आहे का? आपण भारत महान 'मेरा भारत महान' चा नारा देतो, घोषणा करतो, 'मेरा भारत महान' होण्याचे स्वप्न बघतो, परन्तु ते स्वप्न साकार होणार कसे? इंग्रजीमध्ये म्हणतात -"Dreams are not those what you see during sleep, dreams are real dreams are those which don't let you sleep till such time you convert the dreams into actions and reality" स्वप्न ते नव्हे जे आपण पाहतो. स्वप्न ते जे आपल्याला तोपर्यंत झोपू देत नाही. जोपर्यंत पाहिलेले स्वप्न आपण साकार करत नाही. स्वप्न साकार करण्याकरता आपण पहिलं पाऊल उचललं पाहिजे ते आपण सर्वांनी केलं आहे का? हे सर्व महत्त्वाचे प्रश्न आहेत. ह्या प्रश्नांवर गांभीर्याने विचार विमर्श करून एका निश्चित योजनेप्रमाणे कार्यक्रम तयार करून जर प्रयत्न केले नाहीत तर भारत महान सत्ता महान शक्तीच्या रूपात उभा होणार कसा? 'महान राष्ट्र' महानशक्ती होण्याची महत्त्वाकांक्षा एक 'अपूर्ण स्वप्न' रहायला नको.

२. मोठी शक्ती (Major power) महान शक्ती (Great Power) विश्वशक्ती (World Power) हे 'दिव्य स्वप्न' साकार करण्यासाठी, जागतिक, आंतरराष्ट्रीय शासन (Mechanism for international and world order and governance) जागतिक घडामोडी आंतरराष्ट्रीय माध्यम, जागतिक अर्थव्यवस्थेचा, प्रसारमाध्यम व्यवस्थेचा व्यापार, ऊर्जा, न्याय व भौमिकिय व्यवस्था पूर्ण अभ्यास व विश्लेषण करून आर्थिक , व्यापारिक, शैक्षणिक (Human Resource) कूटनैतिक, शासकीय, सामरिक व सैनिकीय सामर्थ्य कसे वाढवायचे व त्याचा उपयोग उचित प्रमाणे करून भारताला एका मोठ्या शक्तीच्या रूपात कसे करायचे हे सर्व महत्त्वपूर्ण व गंभीर प्रश्न आहेत. ह्याची आवश्यक विवेचना मागच्या ५० वर्षांत कधी केली का? आपण फक्त एक under Developed Nation' 'अविकसित राष्ट्र' Developing Nation 'विकासाच्या मार्गावर राष्ट्र' ह्याच उपाधीवर संतुष्ट झालो. जागतिक पटलावर भारताची भूमिका काय असली पाहिजे. ह्याबद्दल भारतीय शासनाने कधीच गांभीर्याने विचार केलाच नाही. सत्ता परिवर्तनामुळे आता थोडा विचार करायला सुरुवात झाली आहे हे भारताच्या भाविष्याकरता स्वागत योग्य आहे. नवीन शासनाचे धोरण योग्य आहे.

३. भारतीय शक्ती सामर्थ्य वाढविण्याकरता भारताला औद्योगिक प्रगतीची आवश्यकता आहे. जोपर्यंत औद्योगिक क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होत नाही तोपर्यंत आपल्याला इतर राष्ट्राच्या दबावात काम करावे लागेल. औद्योगिक प्रगती व आर्थिक प्रगती हे रेल्वेच्या दोन रूळांसारखे आहे. औद्योगिक प्रगतीशिवाय आर्थिक प्रगती होणार नाही व आर्थिक प्रगतीविना आपली औद्योगिक

क्षमता वाढणार नाही. ह्या करिता (Make in India) 'भारतात निर्माण करा.' 'भारतात उत्पादन करा' हे एक महत्त्वपूर्ण पाऊल (step) आहे. यात एक सुधारणा करावयाची आवश्यकता आहे. 'Make in India,make it for the world'. जगात वापरण्याकरता भारतात निर्माण करा. जोपर्यंत आपण निर्यात करणार नाही तोपर्यंत पैसा कुठून ? दुसरा महत्त्वपूर्ण प्रश्न आहे की, Make in India हे करणार कोण? ह्या करता शिक्षित वर्ग, कुशल कारागीर आणि धोरणात्मक नेतृत्वाची गरज असणार. We will need educated, knowledge, skilled human resource and work force. हे दक्ष व कुशल मनुष्यबळ येणार कुठून? याकरिता भारतीय शिक्षणात व शिक्षण पद्धतीमध्ये मूलभूत परिवर्तन करण्याची गरज आहे. आज भारतात पदवीधारी तरुणांची (Degree holder youth) कमी नाही, परंतु गुणवान, ज्ञानवान, कर्तव्यमान परिश्रम करणारे कोण आहे का? आपल्याला एक कुशल कार ड्रायव्हर मिळत नाही!! परंतु लायसन्स घेतलेले तरुण खूप आहेत. पैसे देऊन तुम्ही गाडी चालविण्याचे लायसन्स मिळवू शकता. परंतु ड्रायव्हिंगची दक्षता फक्त लायसन्सनी मिळत नाही त्याकरिता प्रशिक्षण व कौशल्य आवश्यक आहे. skill Development आवश्यक आहे. जर आपल्याला Make in India ची कल्पना साकार करायची असेल तर भारतात Make in India करणारा तरुण वर्ग तयार करावा लागेल. हा वर्ग कार्यकुशल, कार्यक्षम असला पाहिजे फक्त शिक्षणाची उपाधी घेतलेला वर्ग चालणार नाही. याकरिता शिक्षण पद्धतीमध्ये मूलभूत परिवर्तनाची आवश्यकता आहे. नवीन केंद्रशासन याबद्दल प्रयत्नशील आहे.

४. भारताला स्वातंत्र्य १९४७ रोजी मिळालं व चीनला स्वातंत्र्य भारतानंतर मिळालं. परंतु आज २१ व्या शतकात औद्योगिक व आर्थिक प्रगतीमध्ये भारताच्या तुलनेत चीन ३० वर्ष पुढे आहे! हे कसं संभव झालं? ह्याचा अभ्यास कोणी केला आहे का? चीननी सर्वप्रथम "Capacity building" क्षमता वाढविण्याकडे लक्ष दिले. राष्ट्रनीती, राजनीती व युद्धनीतीचा एक महत्त्वपूर्ण सिद्धांत आहे. "Capacity building takes time, once your capacity improves, your capacity and ability, improves. Once your capacity , capability and ability improves, your combat strength improves your ambitions and intentions also change".
''कोणत्या पण व्यक्तीची, समाजाची, राष्ट्राची क्षमता वाढायला वेळ लागतो. क्षमता वाढल्यास योग्यता वाढते, योग्यता वाढल्यास युद्ध सामर्थ्य वाढतं. एकदा युद्ध सामर्थ्य वाढल्यावर - व्यक्तीची, राष्ट्राची महत्त्वाकांक्षा व धोरणात परिवर्तन होते.'' ह्याच कारण आज ते जागतिक क्षेत्रात चीन अमेरिकेला मागे टाकून एकमेव शक्तिशाली राष्ट्र होण्याचा प्रयत्न करत आहे. (China is progressing fast to replace America as world's super power) भारताच राजनैतिक नेतृत्व, राष्ट्रीय नेतृत्व, शासकीय नेतृत्व, आर्थिक, औद्योगिक आणि शैक्षणिक नेतृत्व चीनच्या प्रगतीचा अभ्यास करून शिकायला तयार आहे का? चीनचे भारताबरोबर युद्ध आहे. परंतु राष्ट्रनीती, मनुस्मृती, महाभारत, चाणक्यनीतीमध्ये शत्रुकडून पण शिकण्यासारखं बरंच काही असतं हे स्पष्ट झाले आहे. जोपर्यंत आपण शत्रुकडून, प्रतिद्वंदीकडून शिकणार नाही, तोपर्यंत आपण त्याच्यापेक्षा जास्त समर्थ होणार कसे? जोपर्यंत आपण इतर समर्थ राष्ट्रांकडून शिकणार नाही, भारत समर्थ व शक्तिशाली कसा होणार?

५. विश्व समुदाय, संयुक्त महासंघ, इतर जागतिक प्रमुख गट, युरोपीय समुदाय जी १५ (G-15), जी ८ (G-8), जी ७ (G-7), एशियान(ASEAN) व सार्क (SAARC)सारख्या संघटनात भारताची भूमिका प्रामुख्याने असणे गरजेचे आहे. व ही जाणीव ठेवून भारताच्या परराष्ट्रनीतीमध्ये आवश्यक बदल करण्याची गरज आहे. १९८८ च्या आण्विक परिक्षणानंतर भारताची गणना आण्विक शक्तिच्या रूपात केली जाते. जगात जे राष्ट्र मोठ्या शक्तिच्या रुपात आपली सक्षम भूमिका बजावण्याचे स्वप्न पहात आहे. त्याची महत्त्वाकांक्षा प्रत्यक्ष किंवा, अप्रत्यक्ष रूपात जगातल्या घडामोडी व जागतिक वागणूक त्यांच्याच ताब्यात ठेवण्याची असते व आपले वर्चस्व ठेवण्याकरता अनेक प्रकारचे प्रयत्न करतात. आर्थिक मदत (ज्या प्रकारे अमेरिका व चीन पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत करत आहे.) करतात. काही देशांवर आर्थिक नियंत्रण (Economic sanctions) पण लावतात. हे भविष्यातपण चालतच राहणार. युद्ध सामग्री पण देतात. चीन सातत्याने पाकिस्तानला आर्थिक, औद्योगिक, सामरिक मदत करत आहे कारण चीन पाकिस्तानचा वापर सर्व प्रकारांने भारताविरुद्ध करत आहे व करत राहणारच. यात मुळीच शंका घ्यायला नको. चीन सातत्याने अधिकृत घोषणा करतो की, पाकिस्तानची मैत्री हिमालयापेक्षा उंच, समुद्रापेक्षा खोल व साखरेपेक्षा गोड आहे. भारताचे दोन्ही देश विपक्षी आहेत, प्रतिद्वंदी आहेत. पाकिस्तानच्या संरक्षण मंत्री, प्रधानमंत्री, परराष्ट्र मंत्री, सेना अध्यक्ष व राष्ट्रपतीनी अनेकदा शासकीय रूपात स्पष्ट केले आहे की,

"जगात भारत पाकिस्तानच्या युद्ध शक्ती, सामरिक शक्तीचा वापर फक्त भारताविरुद्ध केला जाईल, व पाकिस्तान अणुबॉम्बचा वापर फक्त भारताविरुद्धच करणार. त्याच पाकिस्तानला चीन व अमेरिका सातत्याने सर्वप्रकारची सहाय्यता करत आहेत व पाठिंबाही देत आहेत. ह्यास्थितीत भारताने चीन व अमेरिकेवर निर्भर राहणं, विश्वास करणं योग्य ठरेल का? चीन सदैव संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तानला पाठिंबा देतो. भारताने अनेकदा संयुक्त राष्ट्र संघात पाकिस्तानच्या विरोधात प्रस्ताव आणले पण चीन सदैव त्याला नकार देतो व पाकिस्तानचे संरक्षण करतो. ह्याचा अर्थ काय आहे? चीनवर भारताने विश्वास करायचा का? नवीन देशांना सुरक्षा परिषदेसारख्या महत्त्वाच्या जागी प्रवेश देणार नाही. जोपर्यंत भारत स्वतःला सर्व रूपात व सर्वपणे सक्षम, सदृढ व सजग करत नाही तो पर्यंत इतर देश भारताची पर्वा करतील का?

६. क्षेत्रीय (Regional) परिपेक्षात विचार केला तर, सोव्हियत युनियनचा विस्तार व प्रभाव कमी करण्याकरिता, अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये पाकिस्तानच्या सैन्याला अफगाणिस्तान सोडण्यास साह्य केले. अफगाणिस्तानमध्ये सोव्हियत संघ यांचा सामरिक, कूटनैतिक व राजनैतिक पराभव झाल्यानंतर सोव्हियत संघात अंतरिक संघटना क्रमात फार मोठे परिवर्तन आले व त्याकारणाने सोव्हियत संघाचे विघटन झाले, तुर्कमेनिस्तान, नाजकिस्तान, उजबेकिस्तान, कजाकस्तान, आदी नवीन राष्ट्रे मी भारतीय सेना मुख्यालयात ब्रिगेडियरच्या पदावर काम करत असतानाच जन्माला आले. त्या काळात सोव्हियत युनियन व अमेरिका हे दोन्हीं राष्ट्र एकदुसऱ्याचे प्रतिद्वंदीच नव्हे शत्रूपण होते. त्यांच्या शत्रूत्वाच्या काळात शीत युद्ध चाललं होते. या सर्व जागतिक घडामोडीचा फायदा चीनने घेतला व सोव्हियत युनियनच्या विघटनानंतर चीन जगात मोठ्या सत्तेच्या रूपात उभारला व आता तो चीन अमेरिकेचा प्रतिद्वंदी आहे व जगात 'सुपरपॉवर' च्या रूपात अमेरिकेची जागा घेण्याचा प्रयत्न करत आहे. अफगाणिस्तान रशिया (तत्कालीन सोव्हियत युनियन) व चीन, भारताच्या अगदी जवळ आहे. परंतु या सर्व परिस्थितीचा फायदा भारताने घेतला का? मुळीच नाही. कारण मोठा विचार दूरगामी दृष्टिकोन, दिव्यदृष्टी, दूरदृष्टी हे शब्द 'राष्ट्रनीती' व आंतरराष्ट्रीय राजकारणात भारतात नाहीत. सर्व भारतीय राजनैतिक पक्षाची महत्त्वाकांक्षा, राजनीती व क्षमता फक्त सत्तेत राहण्याची असते. अंतर्गत, सूक्ष्म, संकुचित दृष्टिकोनच या सर्व पक्षाची एक बाध्यता आहे. स्वतःचा परिवार, स्वतःची खुर्ची व स्वतःकरता पैसा ह्या पुढे विचार करण्याची योग्यताच नाही व ह्याच कारणाने भारतावर १९६२ चे युद्ध चीनने थोपले, १९६५ , १९७१ , १९९९ चे कारगिल युद्ध पाकिस्ताननी थोपले, ईशान्य भारतात बंडखोरी, गृहयुद्ध चीन व पाकिस्तानने थोपले, काश्मीरमधला आतंकवाद पाकिस्ताननीच वाढवला व अजूनपण करत आहे. ह्याचे प्रत्युत्तर भारतानी काय दिले? जागतिक पातळीवर, कूटनैतिक व आंतरराष्ट्रीय रूपात पाकिस्तानच्या विरुद्ध एक पण प्रस्ताव पारित झाला का? ह्या असामर्थ्याचा व असफलतेचा अर्थ भारतीय जनमानसाने काय करावयाचा? सोव्हियत युनियनचा पराभव करण्याकरता जे युद्ध साधन, सामरिक सामुग्री, प्रशिक्षण सहायता व आर्थिक सहायता अमेरिकेनी पाकिस्तानला दिली. त्याचाच वापर पाकिस्ताननी काश्मीरमध्ये भारताविरुद्ध आतंकवाद उभा करण्यात केला. अफगाणिस्तानमध्ये उभे केलेले तालिबान, अलकायद्याचे आतंकवादी पाकिस्ताननीच काश्मीरमध्ये पाठवले. त्याच्या विरुद्ध भारतानी काय केले? हाच आतंकवाद आज पूर्ण भारतात पसरला आहे. भारतीय संसदेवर आक्रमण, वा मुंबई मध्ये अनेक बॉम्ब हल्ले, २६/११ चे आक्रमण हे कोणी केले? ही वृत्ती आली कुठून? कसाबसारखे आतंकवादी आले कुठून? त्यांना पैसा, शस्त्र विस्फोटक सामग्री, प्रशिक्षण प्रोत्साहन, निर्देशित पाकिस्ताननीच दिलं. भारतानी काय केलं? जोपर्यंत जगात भारताच्या सामर्थ्याची जाणीव होत नाही तोपर्यंत भारताचा प्रभाव वाढेल कसा? ह्या करता पण पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत.

७. भारतीय उपमहाद्वीपच्या क्षेत्रावर आपण नजर ठेवली तर आपल्याला सहज कळेल व लक्षात येईल की भारताची वाढणारी क्षमता, सामर्थ्य व प्रभाव काही देशांना आवडणार नाही व भारताची शक्ति, सामर्थ्य न वाढू देण्याकरिता ते अनेक प्रकारचे प्रयत्न करतील व अडचणी पण आणतील. ह्या परिस्थितीचा सामना करून क्षमता व प्रभाव (Influence) निर्बाध्यपणाने वाढू देण्याकरता भारताला दीर्घकालीन धोरण व योजना दोन्ही आवश्यक आहे. परंतु आज ह्या प्रकारचे धोरण, विचार विमर्श, समयबद्ध योजनाक्रम भारतीय शासन तंत्रात आहे का? हा एक फार महत्त्वपूर्ण व गंभीर प्रश्न आहे. कारण मोठी, महान, प्रभावशाली, सामर्थ्यवान शक्तीच्या रूपात भारताचे जगात योगदान हे फक्त जागतिक परिपेक्षात सन्माननीय स्थान (Position of status and prominence) मिळवून घेण्याकरताच नसून, राष्ट्रीय हित व राष्ट्रीय सुरक्षा

(National and National Security) दोन्ही दृष्टिकोनानी महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रनीतीचा एक महत्वपूर्ण सिद्धान्त आहे. 'उपयो सामो उपप्रदान मेद दंडः।' ज्याला आपण सामान्य भाषेत 'साम दाम, भेद, दंड' म्हणतो. दंड शक्तीचा वापर आपण तेव्हाच करू शकतो जेव्हा सक्षम, सज्ज व शक्तिशाली होऊ. औद्योगिक, आर्थिक, क्षमता व सामाजिक क्षमता ह्यात परस्पर समन्वय आहे. ह्याच करता आपण म्हणतो की 'राष्ट्रभक्तीला राष्ट्रशक्तीचे कवच असणे फार गरजेचे असते. त्याचप्रमाणे राष्ट्रशक्तीला राष्ट्रभक्तीचे अंतःकरण पण फार आवश्यक असते. जर भारतीय आर्थिक व्यवस्था सक्षम झाली नाही, औद्योगिक सामर्थ्य वाढल नाही तर सामाजिक क्षमता पण वाढणार नाही. कारण सैनिक व सामरिक क्षमता व सामर्थ्य वाढविण्याकरता औद्योगिक, व्यापारिक, बौद्धिक, सामाजिक चारित्रीक व आध्यात्मिक सामर्थ्य, आंतरिक सामर्थ्य अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक पण आहे.

८. रामायणामध्ये म्हटलं आहे 'समरथ को नही दोश गुसाई' सामर्थ्यवान राष्ट्रात दोष नसतात. दोष नसतात ही वास्तविकता नसते, परंतु ते दोष लपविण्याचे साधन व क्षमता असते. आज अमेरिका व चीनच्या शासकीय व राजकीय पद्धतीमध्ये अनेक दोष आहेत. पण त्या दोषांचा, कमतरतेचा फायदा घेऊन कोणते पण राष्ट्रसंगठन अमेरिका व चीनवर आक्रमण करण्याची हिंमत दाखवेल का? सामर्थ्य भय निर्माण करते. परत रामायणामध्ये म्हटलं आहे, 'भय बिन होत न प्रीति' भय, भीतीच्या बिना प्रतिद्वंद्वी वाकत नाही, वागत नाही म्हणूनच सर्व राष्ट्र अमेरिका व चीनकडे पाहतात, त्यांच्याकडे धावतात. भारताला पण हे सामर्थ्य प्राप्त करणे आवश्यक आहे.

जर भारताला जागतिक परिक्षेत्रात आपले स्थान अग्रणी करायचे असेल तर अथक परिश्रम,सकुशल, सुदृढ, समर्थ्यवान, सशक्त व सक्षम शासकीय पद्धती व शासनतंत्र तयार करावे लागेल. सुरक्षा व्यवस्था तयार करावी लागेल. संरक्षण व्यवस्था तयार करावी लागेल व आंतरराष्ट्रीय पटलावर आपल्या शक्ती व सामर्थ्याचा वापर करून जगात शांती, सुव्यवस्था व सामर्थ्यवान समाज तयार करावा लागेल. तेव्हाच स्वामी विवेकानंदांचे स्वप्न, धोरण, दृष्टिकोन साकार होईल.

I can see India Resing भारताला आता स्वयंशक्ति, स्वसामर्थ्याच्या पायावर परत उभे राहण्याची संधी आली आहे. आपण सर्व, भारतीय शासनाला हे सामर्थ्य परत निर्माण करायला तयार आहोत का? जन सहकार्यानीच शासन सक्षम हाणार व भारत समर्थ होणार.

संपादकीय पान क्र.६ वरून पुढे....

समस्येवरील उपायांकडे आगळ्या दृष्टिकोनातून यशस्वी वाटचाल करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टिकोनाची चर्चा संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक विषयांचे सखोल अभ्यासक भि. रा. तथा दादा इदाते यांनी एका लेखातून केली आहे.

जातींची उतरंड, अगदी उपजातींपर्यंत पसरत गेलेला श्रेष्ठ-कनिष्ठ भाव, जात जपण्याचा अट्टहास (जातीसाठी माती खावी असा वाक्प्रचारच प्रचलित झाला आहे) या जपणुकीच्या दुराग्रहातून प्रसंगी देहदंडाची 'शिक्षा' देण्याचे अंगिकारले जाणारे क्रौर्य .... हा सगळाच अनुभव कुणाही संवेदनशील व्यक्तीला विषण्ण करणारा आहे. तर दुसऱ्या बाजूने आपापल्या परीने या समस्येवर उपाय काढण्याचे छोटे - मोठे प्रयत्नही झाले आहेत/होत आहेत. अशा काही प्रयोगांचा वेध घेण्याचा प्रयत्नही अंकातल्या एका लेखातून केला आहे. अशा प्रयत्नांच्या परिणामांची व्याप्ती मर्यादित असली तरीही त्यांची दिशादर्शकता नाकारता येत नाही.

भारतीय समाजजीवनाच्या संदर्भात 'जातिव्यवस्था' हा विषय गुंतागुंतीचा, व्यामिश्र आणि अपरिमित व्याप्ती असलेला आहे. त्याचा एक-दोन अंकांमधून समग्र अन् सविस्तर आढावा घेता येणे शक्य नाही. मात्र याविषयाच्या विचार मंथनाला गती देण्यात हे अंक काही प्रमाणात तरी सहभागी होतील असा विश्वास वाटतो.

अरुण करमरकर

शिवमुद्रांकचे दाते, जाहिरातदार व आजीव सभासदांना वाढदिवसाच्या शुभेच्छा !

शतं जीव शरदो वर्धमानः शतं हेमंतान् शतं उ वसन्तान् ।
शतं इंद्रो अग्निः सविता बृहस्पतिः शतायुषा हविषेमं पुनर्दुः ।।

अर्थ- अग्नी, इंद्र, सूर्य हे सर्व आमच्या स्तुतीने प्रसन्न होऊन आपणांस शंभर वर्षे आयुष्य देवोत. सतत वाढत्या यशाने युक्त अशा शंभर शरद, हेमंत आणि शंभर वसंत ऋतूपर्यंत आरोग्यसंपन्न शंभर वर्षे आपण जगावे.

ऑगस्ट

१७ ऑग. - श्री. विश्वनाथराव बाणवली, शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, अंधेरी प. मंबई. ९८२०३५२१३२
१७ ऑग.-श्री.परशुरामभाऊ तथा अप्पासाहेब दांडेकर, यशस्वी उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, मुंबई ०२२ २३८६०२७०
१७ ऑगस्ट - श्री. नंदू कान्हू शेजवळ, शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, पुणे . ९८५०४३८६१६
१८ ऑग. - श्री.सिताराम गोविंद नारकर, उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, दादर ९८२०२८९०९०
१९ ऑग. - श्री संदेश अे. परब, शिवमुद्रांकनचे हितचिंतक, जामनगर, गुजरात ९९७४०६६३७३
२१ ऑग. -श्री. उदयराव मधुसूदन खरे, हॉटेल क्षुधाशांती बस स्थानकासमोर, पोलादपूर, ९४२३३७६४६७
२२ ऑग. - सौ. अनुराधा अनिल आपटे, शिवमुद्रांकनच्या हितचिंतीका, मु. भाजे, पोस्ट - मळवली ९७६२८१४४२२
२५ ऑग. - श्री.किशोर महादेवराव शिंदे, शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, चिपळूण ९२२४१२८७००
२६ ऑग. - श्री.दयानंद विद्याधर शेट्ये, गुरुबंधू व हेल्थ केअर मेडिकल स्टोअर्सचे संचालक, दादर ९८६७६४५८८८
२७ ऑग. - श्रीमती सुनिता शांताराम गांगण, शिवमुद्रांकनच्या हितचिंतीका, मुंबई ०२२ २५७७१६५२
२८ ऑग. - श्री. माधवराव रघुनाथ कुलकर्णी, यशस्वी उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, गुरगांव - दिल्ली ९८७१२६१९९७
२९ ऑग. - सौ. वैशाली एन.कवितके - कामत, शिवमुद्रांकनच्या हितचिंतीका, पुणे-तळेगाव. ९४२३५८२४५५
३० ऑग. - श्री. विवेकराव कोतवाल, उद्योजक व शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, गोरेगांव -मुंबई ९८६७६०२२००
३१ ऑग.- श्री अनिल हिरालाल गांधी, प्रसिद्ध छायाचित्रकार, मुंबई. ०२२ २४३६०७४३

श्रावण

श्रावण शुक्लपक्ष ।।५, नागपंचमी - श्रीमंत बळवंत मोरेश्वर तथा बाबासाहेब पुरंदरे, शिवचरित्रकार पुणे.
श्रावण शुक्लपक्ष ।। ७,सप्तमी - श्री. दिलिपराव बाळकृष्ण ठकार, सामाजिक कार्यकर्ते, पुणे ९८९०५२४९५५

सप्टेंबर

१ सप्टें. - श्री. नंदनराव सु. हंडे-पाटील, गुरुबंधू, यशस्वी उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, मुंबई ९८९२८८९८९८
१ सप्टें. - डॉ. उल्हासराव मोहन वैद्य, डॉ. वैद्य लॅबोरेटरीचे आदर्श डॉक्टर, ठाणे ९८२०२०११२०
२ सप्टें. - श्री. रत्नाकर के. शिरसाट, उद्योजक व शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, नाशिक ९४२३९६८६९३
२ सप्टें. - डॉ. भालचंद्र केशव आपटे, औषधीकरण, यशस्वी उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, मुंबई
३ सप्टें - मा. गिरीशराव भालचंद्र बापट, लोकप्रिय आमदार, पुणे. ९८२३०४०४००
४ सप्टें. - श्री. आशिष चंद्रकांत कांबळे, शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, वरळी- मुंबई ९८२०७१३३३४
४ सप्टें - श्री. उत्तमराव तुकाराम कदम, शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, वरळी-मुंबई.९९६९३५५९५६
५ सप्टें. - प्रा. सचिनराव साखळकर, सिनीयर सायन्स कॉलेज, दापोली ९४०४१५८७८०
५ सप्टें - श्री. बाळकृष्ण देविदास शिंदे, शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, चेंबुर-मुंबई ९८२०३१४५५५
६ सप्टें. - श्री. रविंद्र बाळकृष्ण संत, शिवमुद्रांकनचे हितचिंतक, पुणे. ९४२२५१६८९२
८ सप्टें. - श्री. आनंदराव योगीराजसा कलबुर्गी, कलबुर्गी पिक्चर्सचे संचालक, कराड ९४२२६०८२०३
८ सप्टें - श्री. संजयराव पाटील, साई सेल्सचे महासंचालक व शिवमुद्रांकनचे हितचिंतक, कोल्हापूर ९८५०५५५६५५
११ सप्टें - प.पू. मोहनजी भागवत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक
११ सप्टें. - श्री. प्रशांत गोपाळराव गोखले, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पुणे - ९४२२००१८९८
१२ सप्टें - श्री. सुरेशराव रामचंद्र शेट्ये, शिवमुद्रांकनचे हितचिंतक, पुणे ९८५०१५११७५
१४ सप्टें - श्री. मोहन वसंत गिरकर, शिवमुद्रांकनचे आजीव सभासद, करि रोड-मुंबई. ९६१९९६६९४१
१५ सप्टें. - सौ. प्रणाली प्रविण कोलगे, शिवमुद्रांकनच्या हितचिंतीका, माहिम ९८३३७१७३४८

|| श्री गजानन प्रसन्न ||

✻ हमी शुद्धतेची - जोड विश्वासाची ✻

पसा, पसा ओंजळीने, पोते भरले धान्याने ।
दरमहा भिशी भरून, घर भरले समृद्धीने ।।

आमच्या सुवर्ण भिशीत सहभागी व्हा,
आपले घरदार सोने-चांदीने समृद्ध करा.

भगवती ज्वेलर्स

मालपाठक इन्टरप्राईज

श्री गजानन मंदिराजवळ, तळेगाव दाभाडे ४१०५०६, पुणे

शिवशतावरी कल्प

अशक्तपणा, चक्कर येणे, हात पाय दुखणे, कंबर दुखी,
उष्णतेचे विकार, सतत तोंड येणे, हाडांची झीज
भरुन काढण्यासाठी उपयुक्त
चष्म्याचा नंबर कमी होण्यास, संगणकासमोर
बसून काम केल्याने डोळ्यावर व मेंदूवर
आलेला ताण घालविण्यास,
गृहिणी, नोकरी करणाऱ्या महिला, पुत्रवती मातांना
पुरेसे दूध येण्यासाठी, चाळीशी उलटलेल्या भगिनींच्या
आरोग्य- रक्षणासाठी, शक्ती, उत्साह, कार्यक्षमतेसाठी,
ग्रंथोक्त पाठ असलेली सप्तधातू पुष्टी करणारी,
एक कप दुधात दोन चमचे दिवसातून दोन वेळा
घेतल्यास आरोग्य सुधारते व त्वचा नितळ बनते.

८०० ग्रॅम व ४०० ग्रॅम पिशवीत उपलब्ध.

उपलब्धीः सौ.ज्योती जगन्नाथ चव्हाण - ९९२२ ५३५ ७४८.
सौ.चंदा रविन्द्र संत, पुणे -
२५४२ ०५५१ / ९४२२ ५१६ ८७२ / ९४२३ ५०७ ९२८

|| श्रीगणेशाय नमः ||

ॐ श्री स्वामी समर्थ ज्वेलर्स

सोने | चांदी | रत्ने

- आमच्या येथे सर्व प्रकारचे मनपसंत दागिने तयार तसेच ऑर्डरप्रमाणे बनवून मिळतील.
- नवग्रहाचे खडे योग्य किंमतीत उपलब्ध आहेत.

इतरत्र मिळणाऱ्या योजनांच्या सवलतीपेक्षा जास्त फायदेशीर अशी आकर्षक सुवर्ण संचय योजना चालू आहे.

सौ.प्रगती नार्वेकर ९९३०८०८५८६
श्री. प्रशांत नार्वेकर ९८३३०९८११८

शॉप नं. ८, गुलमोहर सोसायटी, रानडे रोड, काळे गुरुजी मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. दूरभाषः २४२२८११८.
e-mail: omshreeswamisamarthj05@gmail.com



।। श्रीस्वामी समर्थ ।।

SHREE ANNAPURNA CATERERS

श्री अन्नपूर्णा केटरर्स

आमच्या येथे शुभ कार्यासाठी
व्रतबंध, वाढदिवस व स्वागत समारंभ इत्यादी
मंगलकार्यात शुध्द-सात्विक भोजनाकरीता...

श्रुती मंगल कार्यालय

१२३६ आपटे पथ, पुणे- ४११ ००४.
दूरभाष- २५५३ १७४९ फॅक्स-२५५२ १४४०.
संचालकः श्री.प्रभाकरपंत तथा बाळासाहेब काजरेकर
E-mail: hrishikeshk1@rediffmail.com,
Visit us at: www.shrutimangal.com

।। श्री स्वामी समर्थ ।।

समर्थ ब्लेसिंग्स ज्वेलर्स

- आपल्या पसंतीनुसार सोने चांदीचे अलंकार बनवून मिळतील.
- राशिचे खडे व अंगठ्या तसेच हॉलमार्क अलंकार उपलब्ध.
- क्रेडीट कार्ड व डेबीट कार्डधारकांचे स्वागत.
- आकर्षक सुवर्ण संचय योजनेत सहभागी व्हा.

दुकान ७, समर्थ हाईट्स, रानडे रोड, गोखले रोड जंक्शन,
दादर प. मुंबई - ४०० ०२८. फोनः २४३८११००
यशवंत नारकर ९९६९५२१७१७/७२०८५४७४३७
रविंद्र नागवेकर ९८६९८४८७०४

जुन्या पुणे-मुंबई मार्गावर तळेगाव चाकण रस्त्यालगत पैसाफंड कारखान्यासमोर महाराष्ट्र-मावळी खवय्यांसाठी
श्री.गिरीषतात्या व सौ.सुजातावहिनी खेर चि.शिवांकुर यांचे शुद्ध शाकाहारी -

मयुरेश डायनिंग हॉल

आमच्या येथे उपमा, पाव भाजी, वडा पाव, मिक्स भजी, सोलकढी इत्यादी रूचकर पदार्थ तसेच महाराष्ट्र-मावळी मासवडी, शेगूळ्ळी रस्सा, पिठलं, झुणका, भरली वांगी, ठेचा, शेंगदाण्याची चटणी सोबत ज्वारीची, बाजरीची, नाचणीची, मक्याची गरम गरम चुलीवरची भाकरी व पोळी ही मिळेल.
गुजराथी थाळी, खिचडी कढी, साऊथ इंडियन डिशेस तसेच आपल्या आवडीनुसार ताजे गरम व रूचकर पदार्थ मिळतील,

मित्र व परिवारांसह निवांत पोटभर चवीने जेवणाची उत्तम सोय.
भारतीय गाईचे दूध, दही, ताक, लोणी व तुप खात्रीशीर मिळण्याचे एकमेव ठिकाण.

मोबा. ९४२३५ ०६७९७

काही चुकलं तर आम्हाला सांगा, आवडलं तर सर्वांना सांगा

केवळ शिवरायांचेच नव्हे तर त्यांच्यासमोर उभ्या असलेल्या आव्हानांचे यथोचित वर्णन असलेले तसेच शाहिस्तेखान, अफजलखान, औरंगजेब यांचेही वर्णन तितक्याच समरसतेने करीत, कोणत्याही उदात्तीकरणाचा धोका टाळत साक्षेपाने त्यांच्या पराक्रमाचे वर्णन या ग्रंथात विशद केले आहे.–

श्रीशिवछत्रपती

(पूर्वार्ध)

लेखक: प्रा. श. श्री. पुराणिक

प्रकाशक: छाया प्रकाशन, तळेगाव दाभाडे.

पृष्ठ संख्या: ४९५. क्राऊन साईज, मजबूत बांधणी

मूल्य: रु. ४५०/-



:उपलब्धता:

प्रा. सुधीर पुराणिक, सुधागड–पाली, जि.रायगड. मोबाईल क्र.– ८१४९२ ५१६१६

प्रा. सौ. अंजली पुराणिक, सुधागड–पाली, जि.रायगड.. मोबाईल क्र.– ९२२६८ ८२८७६

श्री.उमेश पुराणिक, पुणे. मोबाईल क्र.– ९८८१ २०९९०

आदर्श पुस्तकालय, चाळीसगांव जि.जळगांव. मोबाईल क्र.– ९८२२६ ५११२२

शिवमुद्रांकन प्रतिष्ठान, तळेगाव ता.मावळ जि.पुणे.– ९८५०५४९१४६

शिवमुद्रांकन पत्रिका
स्वामी, मुद्रक, प्रकाशक, संपादक
जगन्नाथ मनोहर चव्हाण

Postage Prepaid in cash at Talegaon G. H Post

भारत के समाचार की पंजीयन संख्या- ७०८२४/९९
घोषणापत्र संख्या - पीएचएम/एमआर/२७९/आठ/२००३
समाचार-पत्र पंजीकरण संख्या - पीएमएल/४०/२०१५-२०१७
हर माह राष्ट्रीय सौर शकसंवत दिनांक- १ को प्रकाशन और ३ को तळेगाव जी.एच.-४१०५०७ उपडाकघर मे वितरण किया जाता है ।

KRA JEWELLERS

कृष्णा राजाराम अष्टेकर ज्वेलर्स

पुणेः सोन्या मारुती चौक । चिंचवडः एम्पायर ईस्टेट । नगर रोडः फिनिक्स मार्केट सिटी । बारामती । सातारा

Customer Care: 9595100300

email: info@krajewellers.com | Web: www.krajewellers.com | Follow us on f

प्राप्तकर्त्याचा पत्ता न मिळाल्यास
मासिक या ठिकाणी परत करावे -

शिवमुद्रांकन,
तळेगाव जी.एच. - ४१०५०७
जिल्हा पुणे

प्रति,

२८/स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्या चरणी
मा. प्रधानाचार्य/व्यवस्थापक
महाराजा प्रतापसिंह वेदविद्यालय
वेदविद्या मंदिर, अंबफला
जम्मू- 180 005